# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## राजकीय समाजशास्त्र

# राजकीय गतिशीलता आणि समाज

## विषय कोड : 86627

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, पैठण
छत्रपति संभाजीनगर.

**लेखक** : **डॉ संतोष बालासाहेब कोल्हे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी.

**डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, पैठण
छत्रपति संभाजीनगर.

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | लोकमत (सार्वजनिक मत, जनमत) | १ |
| २ | संस्थात्मक प्रभाव | १२ |
| ३ | सामाजिक आणि राजकीय प्रक्रिया | २६ |
| ४ | परिवर्तनवादी चळवळी व आंदोलने | ४२ |

**तृतीय वर्ष कला**
**सत्र - VI (CBCS)**
**राजकीय समाजशास्त्र**
**राजकीय गतिशीलता आणि समाज**
**अभ्यासक्रम**

**Politics Paper VII (A): Political Sociology**
**Semester VI: Political Dynamism and Society**

**Module 1: Public Opinion**

1.1 Concept

1.2 Opinion Makers: a) Non-Political leaders b) Media

1.3 Impact on Political Behavior

**Module 2: Institutional Impact**

2.1 Political Parties
2.2 Pressure groups

**Module 3: Social and Political Processes**
3.1 Modernisation
3.2 Development

**Module 4: Protest movements and change**

4.1 Mainstream Liberal movements: Consumer and Anti-graft movements

4.2 Social Movements: Old and New

**Recommended Reading**


1 Alavi, H. and Shanin. T.: *Sociology of Developing Societies,* Macmillan, London, 1982.

2 Almond, G. et.al: *Comparative Politics Today: A World View*, 7thedn., Harper/Collins, New York, 2000.

3 Ashraf, Ali and Sharma, L. N.: *Political Sociology: A new grammar of Politics,* Universities Press, Madras, 2004.

4 Biswas, Dipti Kumar: *Political Sociology- An Introduction*, Firma KLM Kolkata, 1978.

5 Chackravarti, Satyabrata, *Political Sociology*, Macmillan, New Delhi, 2011.

6 Gupta, Dipankar: *Political Sociology in India*: *Contemporary Trends*, Orient Longman, New Delhi, 1996.

7 Jangam, R. T.: *Textbook of Political Sociology*, Oxford and IBH Publication Co., New Delhi, 1988.

8 Johari, J. C., *Comparative Political Theory: New Dimensions*, *Basic Concepts and MajorTrends,* Sterling, New Delhi, 1987.

9 Kachole, D. D.: *RajakaranacheSamajshastra* (Marathi); Kailash Publications, Aurangabad.

10 Krishna, D.: *Political Development: A Critical Perspective*, Oxford University Press, 1979.

11 Kulkarni, B. Y.: *RajakiyaSamajshastra* (Marathi); VidyaPrakashan, Nagpur.

12 Miller, A. L. M.: *The Third World in Global Environmental Politics*, Lynne Reinner, Boulder Colorado, 1995.

13 Nash, Kate: *Readings in Contemporary Political Sociology*; Blackwell Publishers, Massachusetts, 2000.

14 Nash, Kate, Scott Alan, *Blackwell Companion to Political Sociology*, Blackwell Publishing House, New Delhi.

15 Oommen, T. K.: Nation, Civil Society and Social Movements: Essays in Political Sociology, Sage Publications, New Delhi, 2004.

16 Prakash, Louis: *Political Sociology of Dalit Assertion*, Gyan Publishing House, New Delhi, 2003.

17 Rotberg, R. I. (Ed).: 'Politics and Political Change', *A Journal of Inter - DisciplinaryHistory*, MIT Press, Massachusetts, 2001.

18 Thomas, Janosiki: *Handbook of Political Sociology: State, Civil societies andGlobalization*, Cambridge University Press.

# १

# लोकमत (सार्वजनिक मत, जनमत)

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ लोकमत

१.३.२ लोकमत निर्मिती

१.३.३ लोकमताचा राजकीय वर्तनावरील प्रभाव

१.४ सारांश

१.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.१ उद्दिष्टे

**"लोकमत"** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. लोकमत म्हणजे काय हे सांगता येईल.

२. लोकमतच्या भूमिका सांगता येतील.

३. लोकमत निर्मितीमधील वेगवेगळे घटक समजावून सांगता येतील.

३. लोकमताचा राजकीय वर्तनावरील प्रभाव सांगता येईल.

## १.२ प्रास्ताविक

राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करताना त्या राजकीय व्यवस्थेतील लोकमताचाही अभ्यास करणे आज क्रमप्राप्त ठरते. राजकीय व्यवस्थेत घडणाऱ्या घटनांवरून आणि त्या घटनांच्या स्वरूपावरून लोकमत हे नेहमीच बदलत राहते. राजकीय व्यवस्थेत मूलभूत स्तरावर, लोकमत सरकार आणि राजकारणाशी संबंधित विषयांवर लोकांच्या सामूहिक प्राधान्यांचे प्रतिनिधित्व करत असते. त्यामुळे लोकमत मत ही एक गुंतागुंतीची घटना आहे. विद्वानांनी सार्वजनिक मत म्हणजे काय याचे विविध अर्थ लावले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने राजकीय व्यवस्थेमध्ये वैयक्तिक मते महत्त्वाची ठरतात. ज्यावेळी त्या राजकीय व्यवस्थेतील नेतृत्व एखादा निर्णय घेतात तेव्हा अल्पसंख्याकांच्या मतांपेक्षा बहुसंख्याकांच्या मतांचे वजन जास्त असावे ही भूमिका स्वीकारून वेगवेगळ्या पद्धतीने निर्णय घेताना आपल्याला दिसून येतात.जनमत हे संघटित गट, सरकारी नेते आणि प्रसार माध्यमे, अभिजन वर्गाद्वारे नियंत्रित केले जाते. सत्तेच्या पदांवर असलेल्या किंवा ज्यांना सत्तेत असलेल्यांपर्यंत प्रवेश आहे त्यांच्या मतांना सर्वाधिक महत्व राजकीय व्यवस्थेत असते. त्यामुळे लोकमत निर्मितीमध्ये

प्रसार माध्यमे, नेतृत्व यांच्या भूमिका ह्या लोकमतांवर प्रभाव टाकतात. त्यामुळे लोकमत हे स्थिर राहणारे नसून ते काळानुरूप बदलत जाते.

## १.३ विषय विवेचन

जनमत हे अनेकदा मतदानाद्वारे निश्चित केल्या जाते.सार्वजनिक धोरणांना पाठिंबा किंवा विरोध दर्शवण्यासाठी राजकीय व्यवस्थेत धोरण निर्मिती करणारे नियमितपणे जनमत सर्वेक्षण घेताना आपल्याला दिसून येतात. उदा. भारतात शेतकरी कायद्याच्या संदर्भात जे काही जन आंदोलन झाले त्या जन आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारला जनमताचे आणि लोकमताचे स्वरूप पाहता ते कायदे वापस घ्यावे लागलेत कारण शेतकरी कायद्याच्या संदर्भातील लोकमत किंवा जनमताचा विरोध सरकारच्या लक्षात आल्याने हे सरकारला करावे लागले. लोकमताचा वापर आपल्या बाजूने करण्यासाठी हितसंबंध राखणारे गट आणि राजकीय पक्ष त्यांच्या भूमिका लोकांसमोर मांडण्यासाठी लोकमतांचा आधार हे सर्वेक्षणाच्या माध्यमातून घेतात. त्यामुळे प्रसारमाध्यमे, सरकार आणि राजकीय व्यवस्थेमध्ये आपल्या भूमिकेचा प्रचार करण्यासाठी जनमत सर्वेक्षणांचा वापर करतात. प्रसार माध्यमे, सरकार हे जनमताचा कानोसा घेऊन राजकीय व्यवस्थेचे स्वरूप बदलताना आपल्याला दिसून येतात. कारण कोणत्याही राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य आणि सुरक्षितता हे नेहमीच लोकमतांवर अवलंबून असते. त्यामुळे लोकशाही शासनाचा आधार हे लोकमत असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यामुळे आधुनिक काळात लोकमत या संकल्पनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान राजकीय व्यवस्थेत निर्माण झाल्याचे दिसून येते.

### १.३.१ लोकमत

लोकमतची ही संकल्पना आधुनिक स्वरूपाची नसून या संकल्पनेचे प्रतिबिंब हे पूर्वीपासूनच आपल्याला पाहावयास मिळते. प्राचीन भारताचा इतिहास पाहता ग्रामीण भागात पंचायती अस्तित्वात होत्या या पंचायतीच्या माध्यमातून दोन्ही बाजूंची बाजू ऐकून घेऊन पंच निर्णय देत असत आणि त्या पंचाचा निर्णयाला पंचमुखी परमेश्वर असे म्हटले जाते. पंचायतचा निर्णय म्हणजे हा लोकांचा निर्णय किंवा लोकमतच असे गृहीत धरले जात होते. पाश्चात्त्य देशात मध्ययुगाच्या काळात Vox populi is vox Desi असा शब्दप्रयोग वापरात होता त्याचा अर्थ लोकांचे मत म्हणजेच देशाचे मत असा धरला जाई.रुसोने फ्रेंच राज्यक्रांती पूर्वी लोकमताच्या संदर्भात राज्याच्या धोरणाची निर्मिती, नियमन, अंमलबजावणी आणि टीका यामध्ये लोकांचा सहभाग म्हणजेच लोकमत असा त्याने अर्थ त्यावेळी लावला होता.

एकंदरीतच लोकमताला आलेले महत्त्व पाहता लोकमत पाहताना कोणत्याही निवडणुकीमध्ये शंभर टक्के मतदान कधीही होत नाही. मतदान करताना लोक उमेदवार, राजकीय पक्ष, जात, धर्म,भाषा नातेवाईक, चर्चेतील राजकीय मुद्दे इत्यादीच्या आधारावर मतदान करतात. त्यामुळे झालेल्या मतदानाचे स्वरूप जर पाहिले तर त्या मतदानात लोकमताचे प्रतिबिंब उमटतीलच ह्याची शाश्वती देता येत नाही. तरीही मतदानाची आकडेवारी ही नेमकी लोकांचा कल कोणी कडे जात आहे हे निश्चितपणे दर्शवत असते. त्यामुळे लोकमत म्हणजे काय याविषयी चर्चा करणे ही बाब अवघड होऊन जाते. कारण लोकमत म्हणजे लोकांचे मत असा आपण सर्वसामान्य अर्थ गृहीत धरतो पण ते सर्व लोकांचे मत असतेच असे नाही त्यामुळे लोकमतच्या

संदर्भात चर्चा करताना सर्वाधिक लोकांचे मत म्हणजे लोकमत असा त्याचा अर्थ घेतला जातो.

सोप्या भाषेत, सार्वजनिक धोरणांचा आधार असलेल्या विशिष्ट समस्यांना तोंड देणारे सरकार आणि समाजाशी संबंध असलेल्या प्रश्नांवर लोकांचा विचार जाणून घेते त्याला लोकमत असे म्हणता येईल.

**कुप्पुस्वामी यांच्या मते**

"लोकमत म्हणजे विशिष्ट वेळी एखाद्या विशिष्ट समस्येबद्दल लहान किंवा मोठ्या समुदायातील लोकांची मते असतात."

**जेम्स टी. यंग यांच्या मते**

"लोकमत म्हणजे तर्कशुद्ध सार्वजनिक चर्चेनंतर सामान्य महत्त्वाच्या प्रश्नावर आत्म-जागरूक समुदायाचा सामाजिक निर्णय."

**ब्राईसच्या मते**

" समाजाला प्रभावित करणाऱ्या किंवा स्वारस्य असलेल्या बाबींच्या बाबतीत समाजातील लोकांच्या एकूण विचारांना दर्शविण्यासाठी सार्वजनिक मत सामान्यतः वापरले जाते."

**आरएच सोल्टनच्या मते**

"सामान्य जीवनासाठी लोक काय विचार करतात आणि काय हवे आहेत याचा संदर्भ हा लोकमतात दिला जातो."

**मॉरिस गिन्सबर्गच्या मते**

जनमताचा अर्थ असा आहे की समाजात कार्यरत असलेल्या कल्पना आणि निर्णयांचे समूह जे कमी-अधिक प्रमाणात निश्चितपणे तयार केले गेले आहेत आणि त्यांना विशिष्ट स्थिरता आहे आणि लोकांना वाटले आहे, जे त्यांचे मनोरंजन करतात किंवा त्यांना सामाजिक मानतात ते अनेक मनांच्या समान कार्याचे परिणाम आहेत.

**किंबाल यंगच्या मते**

एखाद्या विशिष्ट वेळी लोकांचे जे मत असते त्याला लोकमत असे म्हणतात.

**असबिशच्या मते**

कोणत्याही दृष्टिकोनातून एखाद्या विशिष्ट समस्येचा विचार करणाऱ्या एखाद्या गटातील सदस्यांनी व्यक्त केलेले मत म्हणजे लोकमत.

लोकमत म्हणजे योग्य व्यक्तीचे मत आहे ज्याद्वारे सर्व नागरिकांचे समर्थन आणि संयोग प्राप्त होतो.

सार्वजनिक मत म्हणजे संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी कोणत्याही मुद्द्यावर त्यांनी घेतलेले लोकांचे मत अशी ही व्याख्या केली जाऊ शकते.

एकंदरीतच सार्वजनिक धोरण ठरवताना काही लोकांचा संबंध त्या सार्वजनिक धोरणाशी असतो तर काही लोकांचा संबंध त्या सार्वजनिक धोरणाशी नसतो तरीही त्या सार्वजनिक धोरणाविषयी सरकारला लोकांचे मत जाणून घेणे क्रमप्राप्त वाटतेच.

**लोकमताचे वैशिष्ट्ये**

- लोकमतची निर्मिती ही जनतेच्या जाणीव जागृती आणि वैचारिक दृष्टिकोनातून होते.
- घटनांच्या स्वरूपावरून लोकमत घडते.
- एखाद्या समस्येच्या बाबतीत लोकमत हे अनुकूल किंवा प्रतिकूल असू शकते.
- लोकमतातून लोकांच्या विचारांची दिशा कल कळुन येतो.
- लोकमत समूहाला व्यक्तीला क्रियाशील बनवते.
- लोकमतच्या निर्मितीवर रूढी, प्रथा, परंपरा, विचारसरणीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.
- लोकमतची निर्मिती ही प्रसारमाध्यमे आणि नेतृत्वावर अवलंबून असते.
- लोकमत सार्वजनिक महत्त्वाच्या विषयाशी संबंधित आहे. हे लोकांच्या विशिष्ट गटाच्या हिताशी संबंधित नाही.
- लोकमत हे समाजकल्याणासाठी असते. समाजाचे कल्याण हे जनमताचे अत्यावश्यक वैशिष्ट्य आहे.
- लोकमत हे मानवी मनाच्या परस्परसंवादाचे उत्पादन असते.
- जनमत हे विशिष्ट वय किंवा काळाशी संबंधित असते. एखाद्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात त्याचे मूल्यमापन केले जाते.
- जनमताला सांस्कृतिक आधार असतो. समाजाची संस्कृती जनमानसावर प्रभाव टाकते.
- जनमत तयार करण्यासाठी संख्या आवश्यक नाही. बहुसंख्य लोकांचे मत असले तरी एका व्यक्तीचे ही मत सार्वजनिक मत म्हणता येते.

**१.३.२ लोकमत निर्मिती**

लोकमत हे सहजासहजी निर्माण होत नाही तर त्या समाजामध्ये ज्या काही रूढी, प्रथा, परंपरा, विचारसरणी, संस्कृती, शिक्षण, नेतृत्व, समाजातील वेगवेगळे गट याचा प्रभाव हा नेहमीच लोकमतांवर पडलेला असतो.

डब्ल्यू. पी डेव्हिडसनने लोकमत निर्मितीची प्रक्रिया पुढील प्रमाणे सांगितली आहे.

- कोणत्याही समाजातील विशिष्ट घटना उदा. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून झालेले शेतकरी आंदोलन.
- समाजात घडलेल्या विशिष्ट घटनेवरून समाजात वेगवेगळ्या प्रकारचे विचार प्रवाह निर्माण होतात. त्या विचारप्रवाहाचे समाजात प्रतिबिंब वेगवेगळ्या प्रमाणात उमटलेले असते. त्यामुळे त्या घटनेच्या संदर्भातत समाजाच्या प्रतिक्रिया कधीकधी ह्या अनुकूल आणि कधी कधी ह्या प्रतिकूल स्वरूपात उमटताना दिसतात. त्यामुळे त्या घटनेचे समाजावर आणि शासनावर काय परिणाम होतील याचा विचार करताना सरकार जनमताचा कानोसा घेते.
- समाजात घडलेल्या विशिष्ट घटनेच्या संदर्भात ती घटना समाजासमोर आणण्यासाठी नेतृत्व विकसित होते. त्यातून त्याची जबाबदारी ही एखाद्या गटाकडे व व्यक्तीकडे जाते.
- ज्या गटाला किंवा ज्या व्यक्तीला जबाबदारी मिळालेली आहे ती समूहामधील वेगवेगळ्या लोकांची मते जाणून घेतात.
- घटनेच्या संदर्भात उपलब्ध झालेली माहिती नेतृत्व प्रसारित करत असते.
- घडलेल्या घटनेची समाजामध्ये सार्वत्रिक प्रमाणात चर्चा घडवून आणली जाते.
- चर्चेच्या माध्यमातून लोकांनी त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोणत्या पद्धतीने वर्तन करावे याची जाणीव लोकांमध्ये केली जाते.
- घटनेच्या पार्श्वभूमीवर लोकांच्या अपेक्षा आणि दृष्टीकोन आणि त्यांच्या भावना एकत्रित करून लोकमत घडवल्या जाते.
- घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या विचार मंथनातून लोकांच्या कृतीला वेगवेगळ्या प्रकारची चालना मिळते.

लोकमतची पार्श्वभूमी तयार करताना एखाद्या समाजात एखाद्या घटनेच्या संदर्भात लोकमत घडताना ही प्रक्रिया अशीच राहील याचाही आग्रह डेव्हिडसन करत नाही.लोकमतच्या निर्मितीसाठी अनेक साधने आहेत ते  लोकमत तयार करण्यात मदत करू शकतात.

**कुटुंब आणि शाळा -**

कुटुंब हे पहिले महत्त्वाचे केंद्र मानले जाते जिथे लोकांचे मत तयार होते, कुटुंब  हे लोकमतचे असे साधन आहे जिथे लोक त्यांच्या सवयी, आवडी-निवडी विकसित करायला शिकतात.लोकांच्या विकसित झालेल्या सवयी  ह्या  समाजात उदयास येतात त्यातून शिक्षणाच्या माध्यमातून इतरांना सहकार्य आणि असहकार करायला व्यक्ती शिकतात. जेव्हा एखादी व्यक्ती समाजात आपले मत व्यक्त करते जे शेवटी सार्वजनिक मताचा भाग बनत असते.

**वय:**

लोकमत निर्माण करण्यामध्ये वय हा महत्त्वाचा घटक आहे. कारण समवयस्क गटाच्या प्रश्नांवरून अनेक समवयस्क लोक एकत्र येतात. समवयकांना येणाऱ्या संदर्भात येणाऱ्या अडी अडचणी,समस्या यावर जनजागृती करून आपल्या समस्या सोडवण्यासाठी समवयस्कर लोक एकत्र येतात.समवयस्काच्या समस्या, प्रश्न, त्यांची वैचारिक पार्श्वभूमी, विचारशैली ही सारख्याच स्वरूपाची असल्यामुळे समवयस्क लवकर एकत्र येतात व एखाद्या विषयावर आपले मत व्यक्त करतात. त्यातून समवयस्करचे जनमत हे एक समूहाला दिशा देणारे असते.

**उत्पन्न:**

जनमत घडवण्यात उत्पन्न हा ही महत्त्वाचा घटक आहे. कारण समाजामधली सामाजिक आर्थिक विषमता पाहता त्या सामाजिक आर्थिक विषमतेचे मूळ कारण हे उत्पन्न आहे. उत्पन्नाच्या आधारावर समूहामध्ये वेगवेगळे गट आपल्याला पाहावयास मिळतात. त्यामुळे कमी उत्पन्न असलेले लोक जास्त उत्पन्न मिळवण्याच्या दृष्टिकोनातून वाटचाल करतात. त्या दृष्टिकोनातून वाटचाल करत असताना कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्या ज्या काही समस्या आहेत त्या समस्येच्या संदर्भात कमी उत्पन्न असलेल्या लोकांना एकत्रित करून त्या मध्ये जनजागृती घडवून कमी उत्पन्नाच्या लोकांचे एक वेगळे जनमत तयार होते. त्यातून उत्पादक वर्गाला, सरकारला, भांडवलदारांना कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तीच्या संदर्भात त्यांना जनमताच्या आधारावर वेगळी धोरण ठरवावे लागते.

**व्यवसाय:**

कोणत्याही देशाच्या विकासामध्ये व्यवसायाची भूमिका ही महत्त्वाची असते. त्यामुळे व्यवसायाच्या संदर्भात धोरणे ठरवताना व्यावसायिक आपल्याला अनुकूल असलेले धोरण ठरवण्यासाठी व्यावसायिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करतात.त्या जनजागृतीचा प्रभाव आणि व्यावसायिकांचे जनमत पाहता सरकारला त्या व्यवसायाच्या संदर्भात धोरण ठरवताना त्यांच्या भूमिका लक्षात घ्याव्या लागतात. कारण सरकारच्या निर्मितीमध्ये व्यावसायिकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते.

**धर्म:**

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धार्मिकतेचे स्वरूप जर पाहिले तर वेगवेगळ्या प्रकारचे धर्म या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतात. धर्म लोकांना एकत्रित करतो आणि धर्माच्या संदर्भात ज्या काही रुढी, प्रथा, परंपरा, संस्कृती ह्या विषयांवर काही वेळा आक्रमणे होतात त्यावेळी त्या रूढी प्रथा परंपरा संस्कृती ही टिकली पाहिजे या दृष्टिकोनातून धर्माचे जे काही सदस्य आहेत त्यामध्ये मोठ्या प्रमाणात धर्मगुरू जागृती करतात. कधीकधी धार्मिक भावना ही पेटवल्या जातात त्या धार्मिक भावनेच्या आधारावर धर्माचे सदस्य एकत्र येऊन आपले जनमत काय आहे हे सरकारला सांगण्याचा प्रयत्न करतात.

**स्पर्धा:**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार आणि प्रचार पाहता जग आज हे एक खेडे झालेले आहे. त्या दृष्टिकोनातून जगात घडणाऱ्या वेगवेगळ्या घटनांचा प्रभाव हा वेगवेगळ्या देशातील विविध क्षेत्रांवर पडतो. त्यामुळे त्या क्षेत्रात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होताना आपल्याला दिसून येतात. एकंदरीतच देशाच्या आर्थिक विकासामध्ये उद्योगधंद्यांचे, औद्योगीकरणाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु जागतिक राजकारणाचा विचार करता आज उद्योगधंदे औद्योगीकरण यामध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा वाढलेली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून उद्योगधंदे औद्योगीकरण शिक्षण नोकर भरती ह्या वेगवेगळ्या प्रश्नांवर या समूहात काम करणाऱ्या यंत्रणा त्या समूहाच्या हितासाठी एक वेगळ्या प्रकारचे जनमत तयार करून आपल्या मागण्या मान्य करून घेताना दिसतात.

**प्रसार माध्यमे:**

जनमत तयार करण्यासाठी सर्वात उपयुक्त आणि प्रभावी साधन म्हणजे प्रसार माध्यमाकडे पाहिल्या जाते. प्रसारमाध्यम हे माहितीपूर्ण तसेच जनमताची रचना करणारे स्त्रोत्र आहे. प्रसार माध्यम हे एक असे माध्यम आहे की ज्याद्वारे व्यक्तींना राष्ट्रीय हित आणि सार्वजनिक हिताशी संबंधित प्रकरणाची माहिती आणि बातम्या मिळतात. चांगले वृत्तपत्र, प्रसारमाध्यमे, प्रेस हे लोकशाहीचे आरसे आहेत. वृत्तपत्रात जे काही लिहिले जाते किंवा चॅनेलवर जे काही बघितले जाते त्यावर दुसरा विचार न करता लोक लगेच विश्वास ठेवतात. त्यामुळे प्रसार माध्यम हे दुसरे तिसरे काही नसून सामान्य जनता आणि सरकार यांच्यातील संवाद साधणारा मजबूत दुवा आहे. पण, जर प्रसार माध्यमे राजकीय पक्षाच्या, समाजाच्या किंवा भांडवलदारांच्या हातात गेली तर देशाचे फार मोठे नुकसान होऊ शकते.

**राजकीय पक्ष:**

राजकीय पक्षांच्या नेत्याचा 'जनतेवर' खूप प्रभाव असतो. राजकीय पक्ष अनेक विधायक कार्यक्रम हाती घेतात. त्या कार्यक्रमांचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्या राजकीय पक्षांचे नेते प्रभावी भाषणे देतात आणि त्यांच्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी समाजात विविध कार्यक्रम आयोजित करतात. त्या नेतृत्वाचा आणि त्या राजकीय पक्षाच्या विचाराचा धोरणाचा कार्यक्रमाचा हा जनतेवर आणि पर्यायाने जनमतावर परिणाम होत असतो. कोणत्याही राजकीय पक्षाचे अस्तित्व हे लोकमताच्या पाठिंबावर अवलंबून असते त्यामुळे लोकमत आपल्या बाजूने तयार व्हावे या दृष्टिकोनातून राजकीय पक्ष नेहमीच प्रयत्नशील असतात.

**नेतृत्व:**

लोकमत घडवण्यात आणि बदलण्यात नेतृत्वाचा हा मोठा वाटा असतो. नेतृत्व निस्वार्थी आणि राष्ट्रहित वाढवणारे असेल तर लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना ही मोठ्या प्रमाणात विकसित होते. भारतीय लोकांमध्ये राष्ट्रवादीची भावना विकसित करण्यामध्ये स्वातंत्र्य लढ्यातील नेत्यांचे योगदान खूप मोठे आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यावर महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाचा मोठा प्रभाव होता, महात्मा गांधीजीच्या विचारातून देशपातळीवर इंग्रजांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जनमत तयार झाल्याचे आपल्याला दिसून येते. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाच्या प्रभावामुळे नेतृत्वाच्या प्रभावामुळे इंग्रजांना भारतातून जावे लागले.

जसे नेतृत्व तशी प्रजा या दृष्टिकोनातून ज्या देशाचे नेतृत्व हे कणखर असते त्या कणखर नेतृत्वाच्या वैचारिक भूमिकेच्या माध्यमातून लोकही तसेच वागताना आपल्याला दिसून येतात. नेतृत्वाकडे वेगवेगळ्या प्रकारचे गुण असू शकतात आणि त्या वेगवेगळ्या गुणांच्या माध्यमातून नेतृत्व हे एक जनमत तयार करून आपले उद्दिष्ट पूर्ण करताना आपल्याला दिसतात.

### १.३.३ लोकमताचा राजकीय वर्तनावरील प्रभाव

**राजकीय वर्तन**

राजकीय व्यवहाराकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाण्यासाठी राजकीय वर्तनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. राज्यशास्त्रातील वर्तणूक क्रांतीची सुरुवात 1908 मध्ये ग्रॅहम वॉलास यांच्या राजकारणातील ह्युमन नेचर आणि आर्थर बेंटले यांच्या द प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंटच्या ग्रंथातून दिसून येते. चार्ल्स मेरियम आणि त्यांचा विद्यार्थी, हॅरोल्ड लॅसवेल, ज्यांनी राजकारणाचा अभ्यास, सत्ता आणि राजकीय अभिजान वर्ग यांसारख्या नवीन आणि वैज्ञानिकदृष्ट्या पद्धतशीर संकल्पनांची ओळख करून दिली.डेव्हिड ईस्टन, रॉबर्ट ढाल, कार्ल ड्यूश, गॅब्रिएल अल्मंड, डेव्हिड ट्रुमन सारख्या विचारवंताची वर्तनवादी अभ्यास करणारी फळी राज्यशास्त्रात निर्माण झाली.डेव्हिड ईस्टनच्या वर्तनवादी आणि उत्तर वर्तनवादी क्रांतीने वर्तनवादाचा पाया राज्यशास्त्रात रचला.

राजकीय वर्तन म्हणजे राजकारणाबाबत लोकांच्या विचार, भावना आणि कृतीचा अभ्यास.

राजकीय वर्तनाचा अभ्यासात म्हणजे मतदाराच्या अशा वर्तनाचाच अभ्यास केला जात नाही तर लोकांची राजकीय मते, राजकीय दृष्टिकोन, श्रद्धा आणि राजकीय मूल्ये यांचाही विस्तृतपणे अभ्यास केला जातो, हे सर्व राजकीय वर्तनाचा भाग आहेत.

राजकीय वर्तनाची व्याख्या सर्वसाधारणपणे अधिकार आणि विशेषतः सरकारशी संबंधित कोणतीही कृती म्हणून केली जाऊ शकते.

**एल्डरवेल्ड आणि कॅट्झ यांच्या मते,**

राजकीय वर्तन किंवा राजकारणाच्या अभ्यासासाठी वर्तणुकीचा दृष्टीकोन होय.

एकंदरीतच राजकीय वर्तनामध्ये राजकीय दृष्टिकोन राजकीय मत आणि राजकीय मूल्य याचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो.

**लोकमताचा राजकीय वर्तनावर होणारा परिणाम**

लोकमतच्या माध्यमातून राजकीय जाणिवा जागृत होतात त्यामुळे राजकारणातील विचार मूल्य वैचारिकता याच्या माध्यमातून राजकीय वर्तनावर पुढील परिणाम होताना दिसून येतात.

- लोकमताच्या आधारावर लोकांचा राजकीय सहभाग वाढतो आणि त्या सहभागामुळे लोकांचे विचार आणि त्यांच्या भावना व्यक्त होतात. त्या भावना आणि विचार व्यक्त झाल्यामुळे व्यक्तीच्या वर्तनात बदल होतो.

- लोकमतच्या माध्यमातून राज्यकर्त्यांच्या चुकीच्या ध्येयधोरणावर आणि निर्णयावर प्रकाश टाकल्या जात असल्यामुळे शासनाच्या भूमिकेबद्दल लोकांचे राजकीय वर्तन बदलते.

- लोकमताच्या माध्यमातून शासनात लोकांचा राजकीय सहभाग वाढतो आणि वाढलेल्या सहभागामुळे लोकांचा राजकीय पक्ष, हितसंबंधी गट, दबाव गट, राजकीय नेतृत्वाशी लोकांचा संबंध येतो आणि त्या संबंधामुळे एखाद्या प्रश्नांवरील व्यक्तिगत पातळीवरील असलेलं वर्तन लोकमताच्या माध्यमातून बदलताना दिसून येते.

- लोकमतच्या माध्यमातून लोकांच्या विचाराची आणि आचाराची परिणामकता वाढल्यामुळे लोकांच्या निर्णय प्रक्रियेत बदल होतो आणि त्या निर्णय प्रक्रियेचा परिणाम मतदाराच्या राजकीय वर्तनामध्ये दिसून येतो.

- लोकमताच्या माध्यमातून एखाद्या राजकीय व्यवस्थेला आदी मान्यता किती द्यायची हे राजकीय वर्तन ठरवते.

- लोकमताचा रेटा हा निवडणुकीचे निकाल, निवडणुकीचे मुद्दे, राजकीय उमेदवारांचे भवितव्य ठरवण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे मतदाराच्या वर्तनावर या सर्व बाबींचा परिणाम होतो.

- लोकमतामुळे राजकीय उदासीनता ही मोठ्या प्रमाणात कमी होते.

- लोकमतच्या माध्यमातून राजकीय प्रभाव निर्माण करण्यासाठी राजकीय वर्तन उपयुक्त ठरताना दिसून येते.

- लोकांच्या मतप्रदर्शनातून लोकमत व्यक्त होते. लोकांच्या मतप्रदर्शनामुळे राजकीय प्रक्रियेवर आणि राजकीय व्यवस्थेवर मतप्रदर्शनामुळे राजकीय प्रभाव तयार होतो.राजकीय प्रभाव ठरवण्यामागे राजकीय वर्तन महत्त्वाचे असते.

- लोकमताच्या माध्यमातून लोक चळवळी उभ्या राहतात आणि त्या लोक चळवळीतून लोकांच्या वर्तनातून नवीन नेतृत्व निर्माण होताना दिसून येते.

- लोकमतच्या चळवळीतून लोकांच्या आशा आकांक्षा ह्या राजकीय वर्तनाच्या माध्यमातून साध्य होतात.

- लोकमताचा राजकीय स्थैर्य निर्माण करण्यावर मोठा परिणाम होतो. राजकीय स्थैर्य निर्माण करून देण्यात राजकीय वर्तन कारणीभूत ठरते.

- लोकमतच्या माध्यमातून राजकीय परिवर्तने होताना दिसून येतात. ती राजकीय परिवर्तने राजकीय वर्तनाच्या माध्यमातून घडवली जातात.

- राजकीय व्यवस्थेतील अधिकार, राजकीय व्यवस्थेची संरचना, राजकीय व्यवस्थेची कार्यपद्धती, राजकीय व्यवस्थेच्या कार्यक्षेत्रांमधली वाढ किंवा घट या सर्व बाबींचा विचार करता या सर्व बाबींची कार्यक्षमता वाढवण्यासाठी लोकमताच्या माध्यमातून राजकीय वर्तन ह्या बाबींवर प्रभाव टाकतो.

**लोकमताचे महत्त्व**

- लोकांमध्ये जनजागृती घडवून आणणे.
- लोकांना वैचारिक दिशा देणे.
- लोकांमध्ये कृतीवृत्ती घडवून आणे.
- लोकांच्या आशा आकांक्षा प्रतिबिंबित करणे.
- लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडणे.
- लोकांच्या समस्या शासनापुढे प्रभावीरित्या मांडणे.
- लोकांना आपल्या समस्यांची व होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे.
- लोकांचा राजकीय व्यवस्थेमधील सहभाग वाढविणे.
- शासन व्यवस्थेचे स्थैर्य आणि सफलता टिकवणे.
- कायद्याच्या राज्यासाठी लोकमत उपयुक्त पडते.
- चांगल्या कायद्यांच्या निर्मितीसाठी व सर्व समावेशक धोरणांसाठी लोकमत हातभार लावते.

## १.४ सारांश

लोकमत हे समाजकल्याणासाठी असते. समाजाचे कल्याण हे जनमताचे अत्यावश्यक वैशिष्ट्य आहे.त्यामुळे लोकमत हे मानवी मनाच्या परस्परसंवादाचे उत्पादन असते.जनमत हे विशिष्ट वय किंवा काळाशी संबंधित असल्याने जनमताचा राजकीय वर्तनावर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून परिणाम होताना दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा**

**१.लोकमताची संकल्पना स्पष्ट करा.**

---

**२.लोकमत निर्मितीची प्रक्रिया सांगा.**

---

**३.लोकमताचा राजकीय वर्तनावरील प्रभाव सांगा.**

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

Agnone, Jon. 2007.“Amplifying Public Opinion: The Policy Impact of the U.S. Environmental Movement.” Social Forces.

Althaus, Scott L. 2003. Collective Preferences in Democratic Politics. New York: Cambridge University Press.

Bartels, Larry M. 1991. “Constituency Opinion and Congressional Policy Making: The Reagan Defense Buildup.” American Political Science Review.

Best, Samuel J., and Monika L. McDermott. 2007. “Measuring Opinions vs. Non-Opinions: the Case of the USA Patriot Act.” The Forum 5: issue 2, article 7.

Walter Lippmann.1998.PUBLIC OPINION

With a New Introduction by Michael Curtis,Transaction Publishers New Brunswick (U.S.A.) and London (U.K.)❄❄❄❄❄❄❄

# २

# संस्थात्मक प्रभाव

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ राजकीय पक्ष

२.३.२ दबाव गट

२.४ सारांश

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.१ उद्दिष्टे

" **संस्थात्मक प्रभाव**" या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. राजकीय पक्ष आणि दबाव गट म्हणजे काय हे सांगता येईल.

२. राजकीय पक्षांच्या व दबाव गटांच्या भूमिका सांगता येतील.

३. राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्षांचे व दबाव गटांचे स्थान समजावून सांगता येईल.

## २.२ प्रास्ताविक

कोणत्याही राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना आपल्याला त्या राजकीय प्रक्रियेत काम करणाऱ्या संस्था आणि त्यांची कार्यपद्धती ही कोणत्या पद्धतीची आहे हे पाहणी क्रमप्राप्त ठरते.म्हणूनच कोणत्याही देशाच्या राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपाला राजकीय व्यवस्था अशा नावाने ओळखले जाते. प्रत्येक देशाच्या राजकीय व्यवस्थेत विधिमंडळ, राजकीय पक्ष ह्या राजकीय संस्था राजकारणाच्या केंद्रबिंदू असतात. म्हणूनच ह्या राजकीय संस्था त्या त्या देशात राजकारणात प्रमुख भूमिका बजावत असतात.

एकंदरीतच कोणत्याही देशाचे राजकारण हे संविधानाच्या चौकटीवर आधारित असले तरीसुद्धा त्या राजकारणाला सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय घटक हे प्रभावित करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे आजच्या राजकारणाच्या प्रक्रियेत राजकारण केवळ ह्या राजकीय संस्थाच चालवतात असेही नाही तर समाजामध्ये अस्तित्वात असलेले वेगवेगळे गटही ह्या राजकीय प्रक्रियेत समाविष्ट होत असतात.म्हणून प्रत्येक समाजामध्ये आपल्याला विविध गट पाहायला मिळतात. प्रत्येक समाजातील वेगवेगळ्या गटांचे हितसंबंध आणि त्याचे स्वरूप वेगवेगळे असते.समाजाच्या हितसंबंधांचे सुसूत्रीकरण करण्याचे काम हे

गट करतात.हितसंबंधाच्या प्राप्तीसाठी हे गट कोणत्याही देशातील शासन व्यवस्थित आणि राजकीय प्रक्रियेत  हे शासनाच्या सर्व स्तरांवर आढळतात. त्यामुळे हे गट शासनाच्या वेगवेगळ्या स्तरांवर काम करताना शासनाच्या ध्येय धोरणावर प्रभाव टाकून आपले हितसंबंध साध्य करण्याचा प्रयत्न करतात त्या गटाला दबाव गट असे म्हणतात.

राजकीय संस्था चालवण्यासाठी त्या त्या देशातील राजकीय प्रक्रियेत लोक सहभागी होताना आपल्याला दिसून येतात. सोबतच म्हणूनच प्रत्येक देशाच्या निवडणुकीच्या काळात त्या त्या देशातील मतदार म्हणून आपले मतदानाचे कर्तव्य बजावतात. कधीकधी आपल्या राजकीय भूमिका मांडण्यासाठी राजकीय पक्षांचा  किंवा हितसंबंधी गटाचा आधार घेतात.म्हणूनच राजकीय व्यवस्थेचा आधारस्तंभ असलेल्या राजकीय पक्षाचे  आणि दबाव गटांचे महत्व आज आधुनिक राजकीय व्यवस्थेत हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. म्हणून आपण या घटकात राजकीय पक्ष, आणि दबाव गट राजकीय पक्षाचे प्रकार, दबाव गटाचे प्रकार आढावा या घेणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष व दबाव गट व ते करीत असलेले कार्याचे स्वरूप पाहता राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व पाहता  आधुनिक राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्ष आणि दबाव गटांना आलेले महत्त्व लक्षात घेता प्रत्येक राजकीय व्यवस्थेचे  हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरताना दिसतात. राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षांना आणि दबाव गटांना असलेले महत्त्व पाहता राजकीय पक्ष आणि दबाव गटांना केवळ लोकशाही शासन प्रणालीतच त्यांना महत्त्व प्राप्त होते असे नाही, तर हुकूमशाही, संसदीय शासन प्रणाली, अध्यक्षीय शासन प्रणाली या ही ठिकाणी वेगवेगळे राजकीय पक्ष आणि दबाव गट आपल्याला कार्य करताना दिसून येतात. एकंदरीतच प्रत्येक राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाचे  व दबाव गटाचे स्वरूप हे वेगवेगळे असू शकते. म्हणून राजकीय पक्षाच्या आणि दबाव गटाच्या स्वरूपाची चर्चा करताना राजकीय पक्षाचे व दबाव गटांचे जे काही आधार आहेत त्या आधाराचा विचार करता विचारसरणी, हितसंबंध, सत्ताकांक्षा, संघटना, नेतृत्व, कार्यकर्ते हे त्या त्या राजकीय पक्षाचे व दबाव गटाचे प्रमुख घटक ठरतात. म्हणून राजकीय पक्ष आणि दबाव गट म्हणजे काय? हे प्रथम आपल्याला पाहावे लागेल.

### २.३.१ राजकीय पक्ष

राजकीय पक्षाची चर्चा करताना राजकीय पक्षांचा उगम युरोप आणि युनायटेड स्टेट्समध्ये १९ व्या शतकात निवडणूक आणि संसदीय प्रणालींसह झाला.राजेशाही राजवटींमध्ये, राजकीय प्रक्रिया ही काही घराण्यापूर्ती मर्यादित होती. परंतु संसदीय राजवटीची स्थापना आणि पक्षांच्या स्वरूपामुळे ही परिस्थितीआज  बदललेली आहे. २० व्या शतकात संपूर्ण जगात राजकीय पक्षांचा प्रसार झाला. मुळात १९व्या शतकात उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत विकसित झालेल्या, राजकीय पक्षांचा वापर २० व्या शतकापासून पूर्णपणे लोकविकासासाठी हेतूंसाठी केला जात आहे.एकंदरीतच राजकीय पक्षाच्या  विकासाचे स्वरूप पाहता पक्ष हा शब्द राजकीय सत्ता शोधणाऱ्या सर्व संघटित गटांना लागू होतो.म्हणून नेमका राजकीय पक्ष म्हणजे काय? याचा विचार ज्यावेळेस आपल्यासमोर येतो त्यावेळेस राजकीय पक्ष म्हणजे हे अशा व्यक्तींचा समूह आहे की तो समाजामध्ये ज्या काही समस्या आहेत त्या समस्येच्या सोडवनुकीसाठी त्या एखाद्या समूहामध्ये एकमत होते आणि समान

उद्देशाच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन कायदेशीरदृष्ट्या राजकीय सत्ता संपादन करण्यासाठी आणि वापरण्यासाठी संघटित व्यक्तींचा समूह म्हणजे राजकीय पक्ष होय.परंतु वेगवेगळ्या राजकीय विचारवंतांनी राजकीय पक्षाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे मांडता येतील.

**न्यूमनच्या मते,** "राजकीय पक्ष हा मुक्त समाजातील नागरिकांचा संघटित समुदाय आहे जो सरकारवर नियंत्रण ठेवू इच्छितो आणि त्यांच्यासाठी सार्वजनिक सहमतीमध्ये सहभागी होऊन काही सदस्यांना सरकारी पदांवर पाठवण्याचा प्रयत्न करतो."

**कीच्या मते,** "जनतेच्या समस्यांचे धोरणात रूपांतर करणारी मूलभूत स्वरूपाची राजकीय संघटना म्हणजेच राजकीय पक्ष होय."

**एडमंड बर्कच्या मते,** "राजकीय पक्ष हा लोकांचा एक समूह आहे जो, काही तत्त्वांवर सहमती देऊन, त्यांच्या संयुक्त प्रयत्नांद्वारे सार्वजनिक हित वाढवण्यासाठी एकत्र येतात."

**रिग्जच्या मते,** "विधिमंडळ सभासदत्वासाठी होणाऱ्या निवडणुकीत उमेदवार उभे करणारे संघटन म्हणजे राजकीय पक्ष होय."

**लिकाँकच्या मते,** "राजकीय एकक म्हणून काम करणाऱ्या नागरिकांचा असा समुदाय जो की सार्वजनिक प्रश्नांवर त्यांची समान मते आहेत आणि एक समान हेतू साध्य करण्यासाठी मतदानाच्या अधिकाराचा वापर करून शासनाची सत्ता बळकावायची आहे."

**मॅकाइव्हरच्या मते,** "राजकीय पक्ष हा असा एक समुदाय आहे जो की एखाद्या विशिष्ट तत्त्व किंवा धोरणाचे समर्थन करण्यासाठी आयोजित केले जातो आणि तो संवैधानिक मार्गाने ते तत्त्व किंवा धोरण शासनाचा आधार बनवण्याचा प्रयत्न करते."

**गेटलच्या मते,** "राजकीय पक्ष हा नागरिकांचा एक समूह आहे जो पूर्णपणे किंवा अंशतः संघटित असतो, जो राजकीय संस्था म्हणून काम करतो आणि ज्यांचा उद्देश आपल्या मत अधिकाराचा वापर करून सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याचे सामान्य धोरण पार पाडण्यासाठी प्रयत्न करणे."

किमान समान राजकीय उद्दिष्टे आणि मते असलेल्या लोकांचा संघटित गट जो सार्वजनिक पदावर उमेदवार निवडून आणून सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकतात त्यांना राजकीय पक्ष म्हणतात.

भारतात राजकीय पक्षाची व्याख्या या कलमाखाली लोकप्रतिनिधी कायदा 1951 चा 29 क नुसार राजकीय पक्ष म्हणून आयोगाकडे नोंदणीकृत भारतातील वैयक्तिक नागरिकांची संघटना किंवा संस्था म्हणून केली जाते.

एकंदरीतच शाश्वत आणि चांगले कार्य करणाऱ्या लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष समाजाच्या विशिष्ट घटकांमध्ये खोलवर आणि टिकाऊपणे गुंतलेले असतात. ते सरकारी संस्थांना आणि समाजातील नागरी समाजाच्या घटकांशी जोडू शकतात त्यामुळे आधुनिक लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या कामकाजासाठी राजकीय पक्ष आवश्यक असतात. निवडणुकीत लोकांचा पाठिंबा मिळवून त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील

असतात. परिणामी, राजकीय पक्ष समाजातील मूलभूत राजकीय मतभेदांचे प्रतीक आहेत. कारण ते समुदायाचा एक भाग आहेत, पक्षांना राजकीय सत्तेसाठी वेळप्रसंगी पक्षपात करावा लागतो. त्यावरून त्या राजकीय पक्षाची ओळख तो ज्या गटाचे प्रतिनिधित्व करतो, ज्या धोरणांना समर्थन देतो आणि ज्या हितसंबंधांचे रक्षण करतो त्यावरून ठरवली जाते. उदा. डावे पक्ष, उजवे पक्ष.

**राजकीय पक्षांची भूमिका व कार्य:**

लोकशाही समाजात राजकीय पक्ष प्रमुख कार्ये करतात. त्यामध्ये प्रामुख्याने

१. सदस्य आणि समर्थकांच्या सार्वजनिक धोरणाविषयी नागरी गरजाची पूर्तता करणे तसेच नागरी गरजांच्या समस्यांची सोडवणूक करणे .

२. राजकीय आणि निवडणूक प्रणालीच्या कार्यामध्ये आणि सामान्य राजकीय मूल्यांच्या निर्मितीमध्ये मतदार आणि नागरिकांचे सामाजिकीकरण करून त्यांना शिक्षित करणे

३. सार्वजनिक हिताच्या मागण्यांची मागणी करून त्यांचे सामान्य धोरणांमध्ये रूपांतर करणे.

४. सार्वजनिक प्रश्नांच्या संदर्भात लोकमत संघटित करणे.

५. राजकीय निर्णयांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि त्यांच्या मतांचे व्यवहार्य धोरण पर्यायांमध्ये रूपांतर करण्यासाठी नागरिकांना सक्रिय आणि एकत्रित करणे.

६. निवडणुका लढविणे आणि राज्यकारभारात सहभागी होणे.

७. सार्वजनिक हिताच्या प्रश्नासाठी शासन आणि जनता यांच्यामधील समन्वयक म्हणून काम करणे.

८. सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनात राजकीय व्यवस्थेतील शासकीय घटकांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करणे.

९. सार्वजनिक हिताच्या आड येणाऱ्या शासनावर टीका करणे.

**राजकीय पक्षांचे महत्त्व**

राजकीय पक्ष अनेकदा नागरी समाज आणि निर्णय घेणारे आणि अंमलबजावणी करणारे यांच्यातील संस्थात्मक मध्यस्थ म्हणून काम करतात. त्यामुळे ते आपल्या सदस्यांच्या आणि समर्थकांच्या मागण्या संसदेत आणि सरकारमध्ये प्रतिबिंबित करण्यास सक्षम असतात. लोकशाही समाजात पक्ष अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात आणि अनेक कार्ये पार पाडत असले तरी, निवडणूक प्रचारात उमेदवारांचे नामांकन आणि त्यांचा प्रचार हे मतदारांना सर्वात जास्त दृश्यमान कार्य असते. राजकीय पक्ष निवडणूक लढवणे, जनता व शासन यामध्ये समन्वय प्रस्थापित करणे, वेगवेगळ्या योजनांच्या संदर्भात ध्येय धोरण ठरवून ठरविणे व त्या धोरणांची अंमलबजावणी करणे हे काम राजकीय पक्ष करताना आपल्याला दिसून येतात त्यामुळे लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाला अत्यंत महत्त्व प्राप्त होताना आपल्याला दिसून येते कारण लोकांच्या व्यवहाराला वळण लावण्याच्या दृष्टिकोनातून

राजकीय जाणीव आणि जागृती करण्याचे काम राजकीय पक्ष करताना आपल्याला दिसून येतात.

**राजकीय पक्षाचे प्रकार**

केडर पक्ष आणि जन-आधारित म्हणजे जनसामान्यांचा पक्ष (मास बेस्ड पार्टी) असे प्रमुख दोन प्रकार आपल्याला पडताना दिसून येतात.

**केडर पक्ष**

कार्यकर्त्यांना राजकीयदृष्ट्या आपल्या उद्दिष्टेतेच्या पूर्ततेसाठी प्रशिक्षित केलेल्या पक्षांना केडर पक्ष असे म्हणतात. केडर पक्षाचे सामान्यतः संख्येने कमी अनुयायी असले तरी राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित केलेलं केडर आपल्या अनुयायींवर आपले प्रभुत्व निर्माण करताना दिसून येतात. एकंदरीतच त्याचा फायदा त्यांना निवडणुकीच्या वेळी होताना आपल्याला दिसून येतो. निवडणूकीमध्ये उमेदवार म्हणून कोणास उभे करावयाचे, हे पक्ष कार्यकर्त्यांच्या समितीचे म्हणजेच केडरचे काम असते. तसेच पक्षाचे जे नेते आहेत ते नेते निवडण्याचे काम सुद्धा केडरच करताना आपल्याला दिसून येतात.

**जन-आधारित ( मास-बेस पक्ष)**

जन-आधारित पक्षाचे शेकडो, हजारो कधीकधी लाखो अनुयायी असतात. सदस्यसंख्या हाच मास बेस्ड पक्षाचा एकमेव निकष नसला तरीपण अत्यावश्यक बाब म्हणजे असा पक्ष जनतेच्या एखाद्या प्रश्नांवर केलेल्या आवाहनावर जनता त्या पक्षाच्या पाठीमागे उभी राहते त्यावेळी ते पक्ष जनआधारित पक्ष किंवा मास बेस पक्ष म्हणून ओळखले जातात. म्हणजेच जनआधारित पक्ष एखाद्या समूहाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करून त्या समूहातील नागरिकांना आपल्यामध्ये सामील करून संघटित करण्याचा प्रयत्न करतात.

भारतात प्रामुख्याने दोनही प्रकारचे पक्ष आपल्याला दिसून येतात त्यामध्ये केडरमध्ये महत्त्वाचे पक्ष म्हणून बहुजन समाज पार्टी, भारतीय जनता पार्टी, त्याचा प्रामुख्याने आपल्याला उल्लेख करावा लागतो तर मास बेस पक्ष म्हणून काँग्रेस,शिवसेना, तेलगू देसम पार्टी, तेलंगणा राष्ट्र समिती उल्लेख करावा लागेल.

राष्ट्रीय आणि राज्य पक्षांना मान्यता निवडणुकांसाठी निवडणूक आयोग राजकीय पक्षांची नोंदणी करतो आणि निवडणुकीतील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष अशी मान्यता देतो. तसेच निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत झालेले ही पक्ष असतात पण त्यांना मान्यता मिळालेली नसते म्हणून त्यांना नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष म्हणून ओळखले जाते. परंतु भारतीय राजकीय व्यवस्थेचे स्वरूप पाहता भारतामध्ये बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. त्यामुळे भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप पाहताना भारतात राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष, नोंदणीकृत पक्ष असे वेगवेगळे पक्षाचे स्वरूप आपल्याला दिसून येते.त्यामुळे भारतातील राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष म्हणजे काय याचा विचार आपल्याला प्रथमता: करावा लागेल.

राष्ट्रीय आणि राज्य पक्षांना मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षांची नोंदणी करावी लागते.निवडणूक आयोग राजकीय पक्षांना निवडणुकीतील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष अशी मान्यता देतो.तसेच इतर पक्षांना केवळ नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष असे संबोधले जाते.निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या पक्षांना मान्यतेमुळे या राजकीय पक्षांना एक अधिकृत चिन्ह मिळते,तसेच राष्ट्रीय दूरचित्रवाणी आणि नभोवाणीवर निवडणुकीच्या काळात प्रचार करण्याचे अधिकार मिळतात.प्रत्येक राष्ट्रीय पक्षाला संपूर्ण देशासाठी एकच चिन्ह मिळत असते. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्य पक्षाला ज्या राज्यासाठी मान्यता देण्यात आली आहे अशा राज्यामध्ये त्या पक्षाला ही अधिकृत चिन्ह मिळते.तसेच नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष उपलब्ध चिन्हांमधून पर्यायी चिन्ह निवडू शकतात.भारतामध्ये राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष होण्यासाठी निवडणूक आयोगाने काही निकष ठरवलेले आहेत ते पुढील प्रमाणे आपल्याला सांगता येतील.

**राष्ट्रीय पक्ष**

(१) संबंधित पक्षास लोकसभा किंवा विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकीत चार किंवा अधिक राज्यांमध्ये एकूण वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास आणि, त्यासोबतच लोकसभेमध्ये कोणत्याही राज्यातून वा राज्यांमधून चार जागा मिळाल्या असल्यास राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते.

**किंवा**

(२) संबंधित पक्षाने लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये २ टक्के जागा जिंकल्या आणि त्या पक्षाचे किमान तीन राज्यांतून लोकसभेचे प्रतिनिधी निवडून आले असल्यास

**किंवा**

(३) संबंधित पक्षास चार राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळाली असल्यास .

तसेच एखाद्या राजकीय पक्षाला चार किंवा अधिक राज्यांमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली गेली असल्यास, तर तो राजकीय पक्ष संपूर्ण भारतात 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून ओळखला जाईल, परंतु जोपर्यंत तो राजकीय पक्ष व त्यानंतरच्या अटींची पूर्तता करत राहील तोपर्यंत त्या राजकीय पक्षाचा राष्ट्रीय पक्षावरील अधिकार राहतो.

**भारतात सात मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.**

भारतीय जनता पक्ष (भाजप)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC)

ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस (AITC)

भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI)

बहुजन समाज पक्ष (BSP)

भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) (सीपीआय(एम))

आम आदमी पार्टी

**राज्य पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष**

(१) संबंधित पक्षास संबंधित राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राज्यातील वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास आणि शिवाय संबंधित राज्याच्या विधानसभेत २ जागा मिळाल्या असल्यास.

**किंवा**

(२) लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत संबंधित पक्षास संबंधित राज्यातील वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास , आणि शिवाय संबंधित राज्यामधून लोकसभेत १ जागा मिळाली असल्यास.

**किंवा**

(३) संबंधित पक्षास संबंधित राज्यातील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेत ३ टक्के जागा किंवा ३ जागा यांपैकी ज्या कोणत्या अधिक असल्यास.

तसेच एखाद्या राजकीय पक्षाला चार राज्यांपेक्षा कमी राज्यांमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून वागणूक दिली गेली, तर तो ज्या राज्यात किंवा ज्या राज्यांमध्ये तो मान्यताप्राप्त आहे तेथे तो 'राज्य पक्ष' म्हणून ओळखला जातो.परंतु जोपर्यंत तो राजकीय पक्ष व त्यानंतरच्या अटींची पूर्तता करत राहील तोपर्यंत त्या राजकीय पक्षाचा राज्य व प्रादेशिक पक्षावरील अधिकार राहतो.

भारतातील वेगवेगळ्या राज्यामधली प्रादेशिकतेचे स्वरूप पाहता प्रादेशिकतेच्या अस्मितेला महत्त्व देऊन अनेक वेळा राजकारण केल्या जाते, त्यातून त्या प्रादेशिक अस्मितेच्या माध्यमातून अनेक राजकीय पक्ष उदयास आलेले आहेत. त्यामुळे देशातील अनेक राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर अनेक राज्यांमध्ये सत्ता मिळू शकत नाही. देशातील राष्ट्रीय आणि राज्य किंवा प्रादेशिक पक्षाचा संघर्ष पाहता प्रादेशिकता ही भारतीय लोकशाहीची आधारस्तंभ राहिली आहे. एकंदरीतच भारतीय राजकारणाचा स्वरूप पाहता भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे आज वाढत असलेले महत्त्व पाहता हेमसन आणि डग्लस म्हणतात, "भारतातील प्रादेशिकता ही प्रत्येक क्षेत्रासाठी एक अत्यंत गुंतागुंतीची घटना आहे, कारण तेथे उप-प्रदेश आहेत.त्यांनी अनेक राजकीय पक्षांना जन्म दिला आहे, भारतातील राजकीय अस्थिरतेच्या काळात त्रिशंकू संसदेचे स्वरूप पाहता भारतीय राजकीय परिस्थितीत मिळत असलेला जनादेश पाहता प्रादेशिक पक्षांनी देशावर राज्य करण्यासाठी राष्ट्रीय पक्षांना कुबड्या दिल्या आहेत.

**राष्ट्रीय पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष यांच्यातील फरक**

प्रादेशिक पक्षाची सत्ता ही एका क्षेत्रांपुरती मर्यादित असते.राष्ट्रीय पक्ष राष्ट्रीय समस्यांशी संबंधित आहे, तर प्रादेशिक पक्ष केवळ प्रादेशिक समस्यांशी संबंधित आहे. प्रादेशिक पक्षांना त्यांच्या राज्यात अधिक सत्ता आणि स्वायत्तता हवी असते. राष्ट्रीय पक्षांना राष्ट्रीय

सत्तेबरोबरच देशातील वेगवेगळ्या राज्यातीलही सत्ता हवी असते. एकंदरीतच केंद्रात ज्या पक्षाची सत्ता आहे त्याच पक्षाची सत्ता राज्यामध्ये विकासासाठी हवी असा प्रचार केंद्रातील सत्ताधारी पक्ष करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष वाढताना दिसून येतो. राष्ट्रीय पक्ष स्पर्धात्मक काळात प्रादेशिक हितसंबंधाशी जुळवून घेतात. प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय एकात्मता आणि सार्वभौमत्व धोक्यात आणतात असा दावा राष्ट्रीय पक्ष वेळोवेळी करताना दिसून येतात.

### २.३.२ दबाव गट

कोणत्याही सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना सामाजिक सह जीवनातून अनेकदा लोकांचे समान हितसंबंध, समान विचार, समान मित्र, शत्रू हे आपल्याला त्या समाजाचा अभ्यास करताना पाहावयास मिळतात. सोबतच त्या समाज जीवनाचा विचार जर आपण केला तर धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या आधारावर त्या समूहांमध्ये एक जवळीकता आणि ऋणानुबंध निर्माण होतात. हे ऋणानुबंध काही वेळा संघटितरित्या एकत्र आल्याच्ये आपल्याला दिसून येतात.त्यावेळी हे समान हितसंबंध राखणारे गट ज्यावेळी एकत्र येतात त्याला एक हितसंबंधाचे स्वरूप प्राप्त होते आणि त्यातूनच समूहामध्ये वेगवेगळे गट सक्रिय असताना आपल्याला दिसून येतात.

#### दबाव गट अर्थ व्याख्या

दबाव गटाला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते जसे की हितसमूह, गैरसरकारी संघटन, लॉबीज अनौपचारिक संघटन, इत्यादी नावांनी दबाव गटाला ओळखल्या जाते.दबाव गटात आणि अन्य संस्थात्मक संघटनांमध्ये काही प्रमाणात भेद असू शकतो कारण सर्व संस्थात्मक संघटना ह्या दबाव समूह होत नाहीत.

**ॲलन आर. बॉल यांच्या मते** दबाव गट हे राजकीय प्रक्रियेचा एक भाग आहेत आणि ते सरकारी धोरणाची दिशा मजबूत करण्याचा किंवा बदलण्याचा प्रयत्न करतात, परंतु दबाव गट म्हणून, सरकार बनण्याची त्यांची इच्छा नसते.

**हेन्री टर्नर म्हणतात की** परिभाषेनुसार, दबाव गट म्हणजे पक्षपाती नसलेल्या संस्था ज्या सार्वजनिक धोरणाच्या काही टप्प्यांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. ते स्वत: पक्षाच्या कार्यक्रमांचा मसुदा तयार करत नाहीत किंवा सार्वजनिक पदासाठी उमेदवार नामनिर्देशित करत नाहीत.

दबाव गट ही एक  अशी संघटना आहे जी एखाद्या विशिष्ट मुद्द्यावर कारवाई करण्यासाठी किंवा बदल करण्यासाठी निवडून आलेल्या शासन व्यवस्थेवर व त्यांच्या प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करते.

दबाव गट हा लोकांचा संघटित गट असतो ज्याचा उद्देश एखाद्या विशिष्ट कारणासाठी किंवा चळवळीच्या बाजूने सरकारच्या धोरणांवर आणि कृतींवर प्रभाव पाडण्याचा असतो.

दबाव गट ही लोकांची संघटना असते ज्यांचे समान हितसंबंध असतात आणि सरकारवर प्रभाव टाकून त्यांचे हित साधण्याचा प्रयत्न करतात.

दबाव गट हे वेगवेगळ्या हितसंबंधी संघटनांचे रुप आहेत, जे देशाच्या राजकीय किंवा प्रशासकीय व्यवस्थेवर दबाव आणतात आणि त्यातून फायदे मिळवण्यासाठी आणि त्यांचे स्वतःचे हित साधण्यासाठी दबाव आणतात. दबाव गट हा शब्द कोणत्याही हितसंबंधांच्या गटाला सूचित करतो ज्यांचे सदस्य त्यांच्या सामायिक समान गुणधर्मांमुळे इतर गटांवर आणि राजकीय प्रक्रियेवर दावा करतात. आर्थिक, सामाजिक राजकीय क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारचे दबाव गट आपल्याला पाहावयास मिळतात. हे दबाव गट सामाजिक आणि राजकीय मागण्यांच्या बाजूने सरकारी धोरणांवर प्रभाव टाकतात व आपल्या मागण्या पूर्ण करून घेतात.

**दबाव गटांचे वैशिष्ट्ये**

राजकीय व्यवस्थेत दबाव गटांचे अस्तित्व असते. राजकीय व्यवस्थेमध्ये समाजातील सर्व घटकांचे हित जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना असतात. परंतु काही हित संबंधित गटाच्या संदर्भात त्यांचे हित जोपासले जात नाही त्यावेळी समान हितसंबंधावर ते समूह एकत्र येतात.

- दबाव गट सरकारशी जनसंपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. दबाव गटाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न, तक्रारी, निवेदन, मागण्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातात.
- शासनाकडून जनतेच्या हितसंबंधांच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणणे.
- सरकारच्या कार्यशैलीवर नजर ठेवून सरकारच्या निर्णय आणि कृतीमध्ये ज्यावेळी फरक जाणवतो त्यावेळी तो फरक आणि शासनाच्या चुकीच्या निर्णयाची मीमांसा करून जनतेस जागृत करणे.
- दबाव गट सामूहिक हितसंबंधांच्या बाजूने व्यापक सार्वजनिक समर्थन मिळवण्याचा आणि सरकारवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात.
- राजकीय समाजकारणात दबाव गट महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रत्येक दबाव गट कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या प्रायोजकत्वाद्वारे नियंत्रित आणि नियंत्रित केला जातो. विशिष्ट प्रकारची राजकीय मूल्ये जनमानसात प्रसारित करण्यासाठी संधी आणि शक्यता दबाव गटाच्या माध्यमातून निर्माण केल्या जातात.
- वेगवेगळ्या हितसंबंधांचे अभिव्यक्ती आणि एकत्रीकरण करणे.
- सरकारी निर्णय, धोरणे, कायदे याबाबत दबावगट नेहमी दक्ष असतात. या दबाव गटांचे मुख्य उद्दिष्ट सरकारवर जास्तीत जास्त प्रभाव टाकून सरकारचे निर्णय आणि कायदे गटाच्या बाजूने करून घेणे.

**दबाव गटांची कार्ये**

**राजकीय सहभाग:**

दबाव गट हे राजकीय सहभागाचे वाढत्या प्रमाणात महत्त्वाचे घटक बनले आहेत. हितसंबंधांचे गट त्यांच्या समस्यांना पाठिंबा देणारे लोक निवडून आणण्यासाठी निवडणुकांवर प्रभाव

टाकण्याचा प्रयत्न करतात.सोबतच निवडणुकीत आपल्या हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या उमेदवारांना पैसे देणे, निवडणुकीत आपल्या हितसंबंधासाठी लढणाऱ्या उमेदवारांना मान्यता देणे इत्यादी तंत्रांचा ही दबाव गट वापर करतात.

**लॉबिंग करणे:**

प्रस्तावित कायद्याच्या सकारात्मक किंवा प्रतिकूल परिणामांबद्दल माहिती प्रसारित करण्यासाठी संसद सदस्य, मंत्री आणि नोकरशहा यांच्याशी संपर्क करून दबाव गटातून मोठ्या प्रमाणात लॉबिंग केल्या जाते.

उदा: उद्योगाला अनुकूल अशा कर सुधारणा आणण्यासाठी  आर्थिक क्षेत्रातील दबाव गट लॉबीग सरकारकडे करतात.

**लोकांना शिक्षित करणे:**

समान हितसंबंधावरील दबाव गट  मोठ्या प्रमाणावर शासन स्तरावर, शासन स्तरावरील अधिकारी, त्यांचे स्वतःचे सदस्य आणि संभाव्य स्वारस्य गट सदस्यांना शिक्षित करण्यासाठी संप्रेषण माध्यमांद्वारे टीव्ही जाहिराती, प्रायोजित वृत्तपत्र लेख, सोशल मीडिया इ. वापर करतात.

**जनतेला एकत्र करणे:**

हितसंबंधित गट केवळ जनमत तयार करत नाहीत तर काही वेळा सामान्य जनतेला आंदोलनात्मक आणि निषेधाच्या राजकारणाकडे आकर्षित करतात. त्यांना एखाद्या क्षेत्रात उद्योग उभारायचा असेल तर ते आवश्यक वातावरण तयार करून तेथील लोकांद्वारे उद्योगाची मागणी करतात. किंवा एखादा नको असलेल्या उद्योगाच्या संदर्भात विरोध ही करतात.

**धोरण तयार करणे आणि अंमलबजावणी:**

दबाव गट हे सरकारांना माहिती आणि सल्ल्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहेत. त्यामुळे धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत अनेक गटांशी नियमितपणे सल्लामसलत केली जाते. उदा. शेतकऱ्याच्या प्रश्नांच्या संदर्भात शेतकरी प्रतिनिधींशी आणि शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांशी शासन स्तरावरून संपर्क साधला जातो.

**प्रतिनिधित्व**

राजकीय पक्षांद्वारे जनतेच्या हितसंबंधाच्या संदर्भात जे मुद्दे समोर आणले जात नाहीत त्या मुद्द्यांवरून त्या हितसमूहाचे प्रतिनिधित्व करण्याचे काम दबाव गट करताना आपल्याला दिसून येतात.

**दबाव गटांचे तंत्र**

दबाव गट त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध पद्धती, तंत्र वापरत असतात.

- याचिका, पत्रे आणि प्रतिनियुक्ती द्वारे राज्य सदस्य आणि संसदेची लॉबिंग.

- मंत्री किंवा वरिष्ठ लोकसेवकांशी सल्लामसलत.
- व्यावसायिक लॉबीस्ट नियुक्त करणे.
- आदेश किंवा उच्च न्यायालयात अपील करून कायदेशीर कारवाई करणे.
- निवडणुकीमध्ये ठराविक उमेदवारांचा प्रचार करणे किंवा त्यांना विरोध करणे.
- संसद आणि सरकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करणे किंवा रस्त्यावर मोर्चा काढणे.
- राजकीय हेतूंसाठी संपाचे औद्योगिक स्नायू वापरणे.
- लॉबिंग, संप, घेराव, बंद इत्यादीच्या मार्गातून दबाव गट आपल्या मागण्या मान्य करून घेताना दिसतात.
- दबाव गट आपल्या उद्देशाच्या प्राप्तीसाठी आपल्या उद्देशांचा प्रचार आणि प्रसार करतात.
- धोरण निर्मात्यासमोर आपला प्रभाव हा वेगळ्या पद्धतीने पडण्यासाठी दबाव गट वेगवेगळ्या पद्धतीचे आकडेवारी आणि त्याचे परिणाम प्रकाशित करतात.

**दबाव गटांचे प्रकार**

दबाव गट वेगवेगळे असू शकतात, जसे की विद्यार्थी संघटना, शैक्षणिक संस्था, कामगार संघटना, इ.  मोरिस जोन्स यांनी भारतातील दबाव गटाच्या संदर्भात विवेचन करताना असे म्हटले आहे की, भारतीय शासन व्यवस्थेला समजून घ्यायचे असेल तर त्या ठिकाणच्या गैरसरकारी संघटना आहेत त्या संघटनांचा कार्यविधीचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.अल्मंड आणि पॉवेल यांनी तौलनिक राजकारण या पुस्तकात दबाव गटांच्या वर्गीकरणाविषयी तपशीलवार चर्चा केली आहे. अलमंड आणि पॉवेल यांनी भारतातील क्रियाशील दबाव गटांचे वर्गीकरण चार वेगवेगळ्या गटात केले आहे ते पुढील प्रमाणे.

**संस्थात्मक गट Institutional Groups**

हा गट कोणत्याही व्यवसायातील लोकांचा बनलेला असतो. असा गट स्वतःच्या सदस्यांच्या किंवा इतर कोणत्याही गटाच्या हितासाठी काम करत असतात. या संस्थात्मक शक्ती देशाच्या राजकीय व्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

उदा. मुख्यमंत्री क्लब, काँग्रेस संसदीय बोर्ड, राजकीय पक्ष, नोकरशाही इ.

**समुदायात्मक दबाव गट Associational Groups**

समुदायात्मक दबाव गट हे त्या समुदयाची प्रतिनिधित्व करणारे नोंदणीकृत असे गट असतात. उदा.श्रमिक संघ, व्यावसायिक संघ, शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना, कर्मचारी संघटना

**असमुदायात्मक दबाव गट Non-Associational Groups**

प्रतिष्ठा आणि वर्ग-आधारित गट देखील गैर-संघटित दबाव गटाचा भाग आहेत. उदा. धार्मिक गट, जातीय गट, भाषिक गट

**प्रदर्शनात्मक दबाव गट Anomic Groups**

हे दबावगट सहसा एखाद्या विशिष्ट घटनेतून निर्माण होतात. उदा. उल्फा, खलिस्तान लिबरेशन फोर्स, जम्मू अँड कश्मीर लिबरेशन फ्रंट

**दबाव गटाचा राजकीय व्यवस्थेवरील प्रभाव/ दबाव गटांचे महत्त्व**

दबाव गट आकार आणि संघटनात्मक संरचनेत भिन्न असतात, जे सरकारच्या धोरणांवर किती प्रभाव टाकतात हे आवश्यक नसले तरी ही ज्या गोष्टी राजकीय पक्ष करू शकत नाहीत त्या गोष्टी दबाव गटाच्या माध्यमातून केल्या जातात त्यामुळे राजकीय व्यवस्थेत दबाब गटाचा प्रभाव आणि महत्व हे अधोरेखित होते.

- कामगार संघटना, व्यापारी संघटना आणि व्यावसायिक संघटना सरकारवर मोठा दबाव आणून संघटनेच्या दृष्टिकोनातून कामगार व्यावसायिक हितसंबंधाचे रक्षण दबाव गटाच्या माध्यमातून केल्या जाते.
- दबावगट सरकारची जबाबदारी वाढवतात आणि सरकारी कृती आणि निष्क्रियतेवर एक महत्त्वपूर्ण तपासणी म्हणून काम करतात.
- दबाव गट हा सरकार आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. ते सरकारला समाजाच्या इच्छा आकांक्षा पुरवतात त्यामुळे सरकारला इच्छा आकांक्षाच्या पूर्ततेच्या दृष्टिकोनातून आपली वाटचाल करावी लागते.
- निवडणुकांदरम्यान दबाव गट समुदायातील अल्पसंख्याक गटांचे मत व्यक्त करणारे साधन ठरते.
- दबाव गट सरकारला महत्त्वाची माहिती देण्यासाठी उपयुक्त आहेत.
- दबाव गट सरकारला वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात पर्यायी सल्ल्यांचे स्त्रोत्र उपलब्ध करून देतात.
- दबाव गट सामान्यत: राजकीय पक्षात सामील न होता, नागरिकांसाठी राजकीय सहभागाच्या संधींना प्रोत्साहन देतात. शिवाय, ते भाषण स्वातंत्र्य, असेंब्ली आणि असोसिएशनचे लोकशाही अधिकार कायम ठेवण्याच्या दृष्टीने वाटचाल करतात.
- सरकारचे अपयश जनतेसमोर आणण्याचे काम दबाव गटाच्या माध्यमातून केले जाते.

**दबाव गट आणि राजकीय पक्ष यातील फरक**

| अ.क्र | दबाव गट | राजकीय पक्ष |
|---|---|---|
| १ | निश्चित हेतू आणि उद्दिष्टांसाठी दबाव गट, हितसंबंधित गटाचा संदर्भ देतो आणि सरकारी धोरणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न | राजकीय पक्ष लोकांच्या संघटनेला एकत्रित करून सामूहिक प्रयत्नांद्वारे सत्ता |

| | | |
|---|---|---|
| | करतो. | संपादन आणि टिकवून ठेवण्यावर लक्ष केंद्रित करते. |
| २ | प्रभाव पाडणारा. | सत्ता संपादन करणे. |
| ३ | स्वरूप अनौपचारिक असते. | स्वरूप औपचारिक, खुले आणि मान्यताप्राप्त अस्तित्व। |
| ४ | केवळ समान मूल्ये, विश्वास आणि स्थिती असलेल्या व्यक्तीच दबावगटात सामील होऊ शकतात. | समान राजकीय विचारसरणीचे लोक सभासद होऊ शकतात. |
| ५ | हितसंबंधी गट, दबाव गट त्यांच्याशी संबंधित असलेल्या लोकसमूहाच्या हितासाठी रक्षणासाठी कार्य करतात. | राजकीय पक्ष हे देशातील सर्व लोकांच्या हिताचे रक्षण करत असल्याचा दावा करतात आणि त्यासाठी वेगवेगळ्या महत्त्वाच्या गटाच्या हिताचे एकत्रीकरण करून त्यांच्यामध्ये समन्वय साधून वेगवेगळे कार्यक्रम तयार करतात. |
| ६ | दबाव गट निवडणूक लढवत नाहीत; आपले हितसंबंध साध्य करणाऱ्या  राजकीय पक्षांचे समर्थन करतात. | राजकीय पक्ष व त्याचे सभासद निवडणूक लढवतात आणि प्रचारात भाग घेतात. |

## २.४ सारांश

उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत, जनप्रतिनिधित्वाच्या दोन पद्धती असतात. एक म्हणजे राजकीय पक्ष आणि निवडणूक प्रक्रिया.पक्षाचा संबंध हा राजकारणाशी आणि सत्तेशी असतो तर हितगटांचा संबंध आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राजकारणाबरोबर, समाजाच्या वेगवेगळ्या अंगांना सोबत घेऊन चालण्याचे काम हितसंबंधी गट दबाव गट करताना दिसून येतात. दबाव गटाचे हित केवळ शासनाकडून साध्य होईल याची शाश्वती देता येत नाही. त्यामुळे दबाव गट आर्थिक, धार्मिक, सामाजिक ह्या वेगवेगळ्या स्वरूपात कार्यरत असल्याची आपल्याला दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा**

**१.राजकीय पक्षांच्या भूमिका सांगा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

**२.राजकीय पक्ष व दबाव गटामधील फरक स्पष्ट करा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## २.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

Chandra, K. 2004. Why Ethnic Parties Succeed: Patronage and Ethnic Head Counts in India. Cambridge: Cambridge University Press.

Kotliari Rajni,1970. Politics in India, Orient Longman, Delhi,

Mukherji, Rahul .2007. ed. India’s Economic Transition: The Politics of Reforms. New

Delhi: Oxford University Press.

Pai Sudha, 1998.'The Indian Party System Under transfonnation: Lok Sabha Elections

1998'. Asian Survey, vol.XXXVIILNo.9

Sridharan, E. 2004. ‘Electoral Coalitions in 2004 General Elections: Theory and Evidence’. Economic and Political Weekly 3951.

Wyatt, A. 1999 ‘The Limitations on Coalition Politics in India: The Case of Electoral Alliances in Uttar Pradesh’. Commonwealth and Comparative Politics.

Yadav, Y. 1999. ‘Electoral Politics in the Time of Change: India’s Third Electoral System, 1989–99’. Economic and Political Weekly, 21-28 August.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# सामाजिक आणि राजकीय प्रक्रिया

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

 ३.३.१ आधुनिकीकरण

 ३.३.२ विकास

३.४ सारांश

३ .५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.१ उद्दिष्टे

**सामाजिक आणि राजकीय प्रक्रिया** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. आधुनिकीकरण आणि विकास म्हणजे काय हे सांगता येईल.

२. आधुनिकीकरण आणि विकासाच्या भूमिका सांगता येतील.

३. सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेतील व्यवस्थेतील आधुनिकीकरण आणि विकासाचे महत्त्व समजावून सांगता येईल.

## ३.२ प्रास्ताविक

सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेचे स्वरूप पाहता राजकीय जीवनाच्या दृष्टिकोनातून आज राज्यशास्त्रात आधुनिकीकरण आणि विकास या दोन्ही संकल्पनांना अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. राजकीय व्यवस्थेची स्थिरता आणि अस्थिरता ही राजकीय आधुनिकीकरण आणि विकासाशी संबंधित आहे. विकास ही मानवी जीवनाला एक नवीन वळण देणारी आणि मानवाचे जीवन अधिक सुजलाम आणि सुफलाम करणारी संकल्पना आहे. आधुनिक सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेचा विचार करता राज्यांची एकता साधने आणि राष्ट्र उभारणीच्या दृष्टिकोनातून राजकीय विकासाच्या संदर्भात आपल्याला भाष्य करणे क्रम प्राप्त ठरते.

## ३.३ विषय विवेचन

सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेत आधुनिकीकरण आणि विकास ही राजकीय जीवनात चालणारी एक निरंतर प्रक्रिया आहे. समाजातील लोकांच्या आशा, आकांक्षा, भावना विचार ह्या बदलण्यामागे सामाजिक गतिशीलता ही उपयुक्त ठरणारी संकल्पना आहे. त्यामुळे

लोकांच्या आशा, आकांक्षा, विचार हे नेहमीच बदलत जातात. त्यामुळे आधुनिकीकरण आणि विकास ह्या दोन्हीच्या व्याख्या करणे आणि त्याचा निश्चित अर्थ सांगणे कठीण असले तरीही राजकीय प्रक्रिया आणि सामाजिक प्रक्रियेत बऱ्याच वेळा विकास आणि आधुनिकीकरण ह्या संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जात असल्या तरीही त्यामध्ये फरक दाखवणे कठीण आहे.विकास ही संकल्पना प्राचीन काळापासून आहे तर आधुनिकता ही संकल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर जन्मास आली त्यामुळे विकास ह्या संकल्पनेपेक्षा आधुनिकीकरण ही संकल्पना जास्त व्यापक स्वरूपाची आहे.

### ३.३.१ आधुनिकीकरण

आधुनिकीकरणाचा संबंध मूल्याधिष्ठित जीवनाशी नाही तर आधुनिकीकरणाचा संबंध भौतिक जीवनासंबंधीच्या सुधारणावादी प्रक्रियेशी असल्यामुळे या प्रक्रियेतून सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रक्रियेचा मोठ्या प्रमाणात विकास होतो आणि त्या प्रक्रियेलाच आधुनिकीकरण असे म्हणताना आपल्याला दिसून येते.

आधुनिक किंवा आधुनिकीकरण हा शब्द लॅटिन शब्द 'MODO' या शब्दाचा व्युत्पन्न आहे, ज्याचा अर्थ 'आत्ताच' 'किंवा' 'नवीनतम' असा होतो. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीने 'आधुनिक' या शब्दाची व्याख्या 'अलीकडील काळातील काहीतरी किंवा नवीन किंवा नवीनतम, क्लासिकशी संबंधित नाही' अशी केली आहे. अशाप्रकारे, या शब्दाचा शाब्दिक अर्थ जीवन शैली, पेहराव, कला किंवा विचारांमध्ये नवीन किंवा नवीनतम असलेल्या कोणत्याही गोष्टीला सूचित करतो.

**रॉबर्ट वार्ड**

आधुनिक समाज निर्माण करण्याच्यादृष्टीने उपलब्ध साधन सामग्रीचे विचारपूर्वक नियोजन करण्याची प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.

**हटिंग्टन**

मानवी विचार व क्रिया यासंबंधीच्या सर्व क्षेत्रांमध्ये बदल घडून आणणारी बहुमुखी प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.

**भारतीय समाजशास्त्रज्ञ प्रा. वाय. सिंग**

आधुनिकीकरण हे मुद्द्यांकडे तर्कशुद्ध वृत्तीचे प्रतीक आहे आणि त्यांचे मूल्यमापन सार्वत्रिक, विशिष्ट दृष्टिकोनातून नाही. त्यामुळे आधुनिकीकरणामध्ये वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञानाचा प्रसार करणे समाविष्ट आहे.

**सीई ब्लॅक यांनी त्यांच्या 'डायनॅमिक्स ऑफ मॉडर्नायझेशन' या पुस्तकात आधुनिकीकरण पुढील प्रमाणे सुचवले आहे,**

ज्याद्वारे ऐतिहासिकदृष्ट्या विकसित संस्था वेगाने बदलत असलेल्या कार्यासाठी स्वीकारली जाते जी मानवाच्या ज्ञानात अभूतपूर्व वाढ दर्शवते, वैज्ञानिक क्रांतीसह अलीकडच्या शतकांमध्ये त्याच्या पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्यास परवानगी देते त्याला आधुनिकीकरण असे म्हणता येईल

## आधुनिकीकरणाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

- आधुनिकीकरण म्हणजे एखादी गोष्ट अद्ययावत करण्याची किंवा समकालीन प्रणालीत कार्य करण्याची प्रक्रिया.
- देशात आर्थिक आधुनिकीकरण आणि शांतता प्रस्थापित करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे .
- आधुनिकीकरण ही बदल घडवून आणण्याची प्रक्रिया आहे, याचा अर्थ विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित समाजाच्या प्रक्रियेत बदल घडून येतो.
- आधुनिकीकरणाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणे हा त्याचा उद्देश आहे.
- आधुनिकीकरण ही एक गतिमान प्रक्रिया आहे.
- पारंपारिक समाजाचे आधुनिक समाजात रूपांतर करने.
- देशाला प्रगत, विकसित आणि नवीन बनवते.
- आधुनिकीकरण ही एक प्रगतीशील प्रक्रिया आहे.
- एखाद्या देशाच्या भौतिक संस्कृतीबरोबरच तिची जीवनशैली, मूल्य प्रणाली आणि विश्वासांमध्येही बदल घडवून आणते.
- राष्ट्राचा विकास आणि नागरिकांचे जीवनमान उंचावणे हे त्याचे अंतिम ध्येय आहे.
- आधुनिकीकरण म्हणजे मूल्य अभिव्यक्ती व आकांक्षा मधील मूलभूत बदल करणारी प्रक्रिया आहे.
- आधुनिकीकरण म्हणजे व्यक्तीच्या ज्ञानामध्ये आणि वातावरणात भर टाकणारी प्रक्रिया होय.
- कुटुंब, जाती, ग्राम यासंबंधीच्या व्यक्तीच्या निष्ठेत होणारा बदल म्हणजेच आधुनिकीकरण होय.
- विकसित अर्थव्यवस्था
- व्यापक राष्ट्रहित
- लोकशाहीकरण
- मुक्त समाज.
- सामाजिक-आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय चळवळीचे आयोजन करण्यासाठी आणि सुधारणा हाती घेण्यासाठी गतिशील नेतृत्व.

"द पासिंग ऑफ द ट्रॅडिशनल सोसायटी-मॉडर्नाइझिंग ऑफ मिडल इस्ट" चे लेखक डॉ. लर्नर. आधुनिकतेची इतर पाच वैशिष्ट्ये देखील सांगितली आहेत

- शहरीकरण
- साक्षरता
- प्रसार माध्यमे आणि जनसंवाद
- वाढती राजकीय जागरूकता
- जलद औद्योगिकीकरणासाठी आर्थिक विकास आणि तांत्रिक प्रगतीला पाठिंबा देण्यासाठी कुशल मनुष्यबळ

एकंदरीतच आधुनिकीकरणाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये पाहता आधुनिकीकरणाचा अर्थ प्रत्येकासाठी वेगवेगळा आहे. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र या विषयातील विद्वानांनी आधुनिकीकरणाच्या संकल्पनेचा त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने अभ्यास केला आहे ज्यामुळे दृष्टीकोनात अधिक गोंधळ आणि विषमता निर्माण होते.सामान्य माणसासाठी याचा अर्थ सोयी-सुविधा गोळा करणे आणि वापरणे असा आहे. अशिक्षित ग्रामीण व्यक्तीसाठी औद्योगिकीकरण म्हणजे आधुनिकीकरण. समाजशास्त्रज्ञांसाठी ही एक प्रक्रिया आहे ज्यामुळे विविध समाज वेगळे केले जाऊ शकतात. अर्थशास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनातून ज्याद्वारे समाज नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उपलब्ध संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून आर्थिक विकास होऊ शकेल. इतिहासकाराच्या दृष्टीकोनातून, ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामुळे एखाद्या व्यक्तीला नवीन ज्ञान प्राप्त होते आणि त्याच्या आधारावर त्याची जीवनशैली आणि विचार बदलत जातो.

मॉडर्न, मॉडर्निटी आणि मॉडर्नायझेशन या संकल्पना प्रचंड प्रसिद्ध आहेत, मुख्यतः त्यांच्या संदिग्धता आणि अस्पष्टतेमुळे प्रत्येकाचा कोणताही नेमका अर्थ आपल्याला शोधता येत नाही. १९५०-६० च्या दशकात विशेषतः द्वितीय विश्वयुद्धाच्या समाप्तीनंतर आधुनिकीकरणाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती आणि काही प्रमाणात,श फ्रान्समधील फ्रेंच क्रांतीने आधुनिकीकरण प्रसिद्ध केले.

या मॉडर्न, मॉडर्निटी आणि मॉडर्नायझेशन तीन संकल्पनांवर लिहिलेल्या साहित्यामध्ये अनेक विरोधाभासी निरीक्षणे आणि निष्कर्ष आहेत. परिणामी सामाजिक,राजकीय बदलासाठी आधुनिकीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी आधुनिकीकरणाचा एकही सिद्धांत न्याय्यपणे मांडला गेला नाही. आधुनिकीकरणाची प्रक्रिया पुनर्जागरणाच्या काळापासूनची आहे आणि साहित्य, विज्ञान धर्म इत्यादी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील निर्मिती च्या दृष्टिकोनातून आधुनिकीकरणाकडे पाहिल्या जाते.

आधुनिकीकरण नवीन मानकांच्या प्रसारावर भर देते जसे की वैज्ञानिक दृष्टीकोन, तर्कावर आधारित तर्कवाद, वैश्विकता, मानवतावाद, व्यक्तिवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही उदारमतवाद इ.मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानाचा वापर हा आधुनिकीकरणाचा आणखी एक पैलू आहे. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून,

आधुनिकीकरणामुळे व्यक्तींच्या प्रेरणेचा स्वभाव, वृत्ती व्यक्तिमत्व आणि भूमिका-धारणेत बदल घडून येताना आपल्याला दिसून येतात.

रुस्टो आणि वॉर्डच्या मते, आधुनिकीकरणासाठी उचलल्या जाणाऱ्या बाबींमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असतो.

- अर्थव्यवस्थेचे जलद औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योग, शेती अधिक उत्पादक आणि फायदेशीर कसे बनवायचे हे वैज्ञानिक ज्ञान आणि तांत्रिक ज्ञानाचा अवलंब करणे.
- कल्पना, मूल्ये आणि संस्कारांचे धर्मनिरपेक्षीकरण
- सामाजिक गतिशीलता वाढविणे.
- वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षणाचा प्रसार.
- उच्च राहणीमान आणि विचारसरणी
- शहरीकरण.
- साक्षरतेची उच्च पातळी
- वाढणारे दरडोई उत्पन्न.
- विकसित आणि व्यापक प्रसार माध्यम.
- महिला आणि मुलांसाठी उत्तम आरोग्य आणि स्वच्छताविषयक परिस्थिती.
- गरिबी आणि बेरोजगारी निर्मूलन
- अंधश्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्याशी लढण्यासाठी व्यापक दृष्टीकोन.

**आधुनिकीकरणाचा प्रभाव**

आधुनिकीकरणाच्या प्रभावाचे परिणाम टप्प्याटप्प्याने अनुभवता येतात. आधुनिकीकरणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात शेतकरी उदरनिर्वाहाच्या शेतीच्या पलीकडे जाऊन अतिरिक्त अन्नाचे उत्पादन करतात, जे ते वस्तू आणि सेवांसाठी खरेदी करण्याऐवजी पैशासाठी बाजारात विकतात. आज साधने आणि पारंपारिक हस्तकलेची जागा औद्योगिक तंत्रज्ञानाने आणि वैज्ञानिक ज्ञानाने घेतली आहे. शहरे औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्रे म्हणून उदयास येतात आणि ग्रामीण भागातील स्थलांतरितांना आकर्षित करतात.आधुनिकीकरणाने विकसनशील देशांतील लोकांचे आरोग्य सुधारले, दीर्घायुष्य, विश्रांती आणि समृद्धी दिली. लोकांनी नवीन मार्गांचा प्रयत्न करण्याबद्दल अधिक लवचिक बनले आणि त्यांच्या स्वतःच्या जीवनाबद्दल अधिक सकारात्मक आणि कृती-केंद्रित वृत्ती आधुनिकीकरणामुळे स्वीकारली आहे.

दुसरीकडे, आधुनिकीकरणामुळे अनेक ताण निर्माण झाले आहेत कारण लोकांना औद्योगिकीकरण, शहरीकरण, धर्मनिरपेक्षीकरण आणि जलद बदलांना सामोरे जावे लागत आहे. नवीन प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक क्रियाकलापांच्या विकासामुळे पारंपारिक

जीवनशैलीशी संघर्ष निर्माण होतो आहे. आधुनिकीकरणाचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी, राजकीय व्यवस्थेला, प्रथम, नवनवीन धोरण, म्हणजे, सामाजिक आणि आर्थिक सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम असणे आवश्यक आहे. राजकीय व्यवस्थेची दुसरी गरज म्हणजे आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक शक्तींना यशस्वीपणे आत्मसात करण्याची क्षमता आणि बदललेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी नवीन सामाजिक चेतना प्राप्त करणे.

एकंदरीतच आधुनिकीकरणाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये पाहता आधुनिकीकरणाची संकल्पना ही वेगवेगळ्या प्रकारे विकसित केल्या जात असली तरीही राज्यशास्त्रामध्ये राजकीय आधुनिकीकरण म्हणून आधुनिकीकरणाची संकल्पना कशी विकसित होत गेली याचाही अभ्यास करणे आपल्याला आवश्यक आहे.आधुनिकीकरण ही समाजशास्त्रातली संकल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राज्यशास्त्रज्ञांनी राज्यशास्त्रात उपयोगात आणली त्यामुळे राजकीय आधुनिकीकरणाला एक निश्चित अर्थ प्राप्त करून देण्याचे काम राज्यशास्त्रज्ञांनी केले आहे.

## राजकीय आधुनिकीकरण

हंटिंग्टन आधुनिकीकरणाचे वर्णन करतात, "मानवी विचार आणि क्रियाकलापांच्या सर्व क्षेत्रांमध्ये बदल समाविष्ट असलेली बहुआयामी प्रक्रिया" अशी व्याख्या केली आहे त्यामुळे आधुनिकीकरण ही एक प्रक्रिया आहे जी सर्व स्तरातील घटकांना प्रभावित करते.

राजकीय आधुनिकीकरण म्हणजे सामाजिक आणि भौतिक वातावरणातील बदलांना प्रतिसाद म्हणून राजकीय संस्कृतीचे परिवर्तन होय.

### व्याख्या

### कार्ल ड्यूशने

ज्याद्वारे लोकांचा मोठ्या प्रमाणावर राजकीय सहभाग दिसून येतो आणि राजकीय विकेंद्रीकरण वाढते ती प्रक्रिया म्हणजेच राजकीय आधुनिकीकरण होय.

### क्लॉडेन ई. वेल्च जूनियर

संसाधनांच्या तर्कशुद्ध वापरावर आधारित आणि आधुनिक समाजाची स्थापना करण्याच्या उद्देशाने परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजेच राजकीय आधुनिकीकरण होय .

### रॉजर्स आणि सेनिंग

पारंपरिक राजकीय जीवन प्रणालीचा त्याग करून तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत आणि गतिमान राजकीय जीवन प्रणाली ज्यावेळेस एखादा समाज स्वीकारतो त्या प्रक्रियेला राजकीय आधुनिकीकरण असे म्हणतात.

**कोलेमन**

संक्रमण काळातील समाजाच्या राजकीय व्यवस्थेमध्ये संरचनात्मक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समुच्चय घडवून आणणारे परिवर्तन म्हणजेच राजकीय आधुनिकीकरण होय.

राजकीय क्षेत्रातील बदल विषयक प्रक्रिया म्हणून राजकीय आधुनिकीकरणाकडे पाहिल्या जाते.

शासन सत्तेचे केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, अलगीकरण, विशेषीकरण आणि संरचनाचे एकात्मकरण हे राजकीय आधुनिकीकरणाच्या माध्यमातून केले जाते.

लोकांचा राजकीय सहभाग वाढतो.

राजकीय व्यवस्थेची एकरूप होण्याची लोकांची प्रवृत्ती वाढते.

राजकीय आधुनिकीकरणावर सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, आर्थिक आणि राजकीय अशा विविध घटकांचा प्रभाव पडतो.आधुनिकीकरण घडवून आणण्यासाठी संवाद हा एक महत्त्वाचा घटक आहे.

**राजकीय आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये**

- शासन शसंस्थेत कायदेशीर, प्रशासकीय आणि राजकीय अधिकार क्षेत्रात वाढ होने.
- शासन सत्तेचा समाजातील विविध स्तरांमध्ये प्रसार होणे.
- राजकीय सहभाग वाढवणे.
- राजकीय व्यवस्थेचे लोकशाहीकीकरण करणे.
- राजकीय व्यवस्थेत तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणाचा वापर.
- औद्योगीकरण, शहरीकरण
- राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी राजकीय व्यवस्थेत बदल घडवून आणणे
- शैक्षणिक विकास
- राजकीय जनजागृती आणि राजकीय गतिशीलता
- प्रसारमाध्यमांची स्वायत्तता
- सामाजिक गतिशीलता
- राष्ट्रीयत्वाची ओळख

**राजकीय आधुनिकीकरणाचे फायदे**

- राजकीय सत्तेची संरचना बदलते.
- धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्थेची निर्मिती होते.

- सत्तेचे विकेंद्रीकरण होते.
- जनतेच्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी व सोडवण्यासाठी राजकीय आणि प्रशासकीय संघटनांची निर्मिती होते.
- व्यक्तीमध्ये समाजामध्ये नागरिकत्वाची भावना विकसित करण्यासाठी राजकीय आधुनिकीकरण महत्त्वाचे ठरते.
- लोकांच्या सार्वभौमत्वाला मान्यता देणे.
- लोकमतच्या पाठिंब्याच्या आधारावर राजकीय निर्णय घेणे.
- नेतृत्वाला आधि मान्यता मिळते.
- राजकीय आधुनिकीकरणामुळे राजकीय व्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय सामंज्ष्यांची भावना विकसित होते.
- राजकीय व्यवस्थेत आणि शासन व्यवस्थेत कार्यात्मक दृष्टिकोन तयार होतो.
- राजकीय व्यवस्थेमध्ये गुन्हा कर्तुत्वाच्या आधारावर राजकीय श्रेष्ठ जन होण्याची संधी सर्वांना उपलब्ध होते.

**राजकीय आधुनिकरणाचे माध्यमे**

- नेतृत्व
- राजकीय पक्ष
- नोकरशही
- प्रसार माध्यमे
- दबाव गट

एडवर्ड शील्स यांनी पॉलिटिकल डेव्हलपमेंट ऑफ न्यू स्टेटस, डेव्हिड ॲप्टरने द पॉलिटिकल मॉर्गनायझेशन, या ग्रंथात राजकीय आधुनिकीकरणासंदर्भात महत्त्वाचे विचार मांडलेले आहेत तसेच जेम्स कोलमन, सिरीयल ब्लॅक,ऐसेडन्ट यांनीही राजकीय आधुनिकीकरणाच्या संदर्भात आपले वेगवेगळे विचार मांडले आहेत.

**राजकीय आधुनिकीकरणातील अडथळे**

- परंपरा संस्कृती विषयी अभिमान
- जुन्या संस्थांना आवाहन
- जातीय भावना
- राष्ट्रीयत्वाची झालेली क्षीणभावना
- नायकवादाचे समर्थन
- असमानता आणि विषमता
- सामाजिक न्याय समस्या

### ३.३.२ विकास

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रामुख्याने प्रत्येक राष्ट्र विकासावर लक्ष केंद्रित करू लागले आहे.बदल हा निसर्गाचा नियम आहे, समाज, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, भूगोल आणि संस्कृती - या सर्व बदलाच्या अखंड प्रक्रियेतून जातात. जात, कुटुंब आणि यासारख्या सर्व संरचनात्मक श्रेणी आणि प्रथा, परंपरा, मूल्ये, विचारधारा, कला आणि कलाकृती यासारख्या सांस्कृतिक श्रेणी या प्रक्रियेत येतात. त्या दृष्टिकोनातून प्रथा, परंपरा, मूल्य विचारधारा ह्या कायमस्वरूपी टिकत नाहीत.

काही बदल स्वयं-चालित आणि अव्यवस्थित आहेत आणि तर काही हेतूपुर्वक, नियोजित आणि पाठपुरावा केलेले आहेत. समाजाच्या संरचनेत आणि संस्कृतीतील बदल हे मुख्यत्वे उत्क्रांती स्वरूपाचे आहेत. म्हणून बदलाच्या संदर्भात भूमिका मांडणाऱ्या विकास, प्रगती आणि उत्क्रांती या बदलाच्या वेगवेगळ्या पद्धती दर्शविण्यासाठी वेगवेगळ्या संकल्पना आहेत.

#### विकास म्हणजे काय?

विकास या शब्दाचे वेगवेगळ्या संदर्भांमध्ये वेगवेगळे अर्थ आहेत आणि ते अनेक संदर्भांमध्ये स्पष्ट केले जाऊ शकतात उदा. दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, असमानता कमी करणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण यांसारख्या बहुआयामी उद्दिष्टांच्या दिशेने प्रगतीच्या संदर्भात वेगवेगळे दृष्टिकोन विकासाविषयी तयार करण्यात आलेले आहेत.

#### लिबर्ट, पौलोस आणि मॅनर

विकास म्हणजे कालांतराने वाढ आणि क्षमतेत बदल तो परिपक्वता आणि पर्यावरणाशी संबंधित असतो.

#### ईबी हर्लोक

विकास म्हणजे परिपक्वता आणि अनुभवाच्या परिणामी क्रमाने अंदाज लावता येण्याजोग्या नमुन्यात घडणाऱ्या बदलांची एक प्रगतीशील मालिका.

#### जेई अँडरसन

विकासाचा संबंध वाढीशी तसेच पर्यावरणीय परिस्थितींमुळे वर्तनातील बदलांशी संबंधित आहे.

विकास हा समाजात अपेक्षित बदल कसा साधला जातो याविषयीचा सर्वांगीण दृष्टीकोन आहे. विकासाची संकल्पना ही विविध सामाजिक विज्ञान शाखा आणि त्यांच्या दृष्टिकोनांवर आधारित आहेत. आधुनिकीकरणाचा सिद्धांत समाजात ज्या प्रक्रियेमध्ये आधुनिकीकरण घडते त्याचे विश्लेषण करण्यासाठी वापरले जाते. देशांच्या सक्षमीकरणासाठी कोणते पैलू फायदेशीर आहेत आणि आर्थिक विकासासाठी कोणते अडथळे आहेत हे विकासाच्या संकल्पनेत पाहिल्या जाते. विशिष्ट पैलूंवर लक्ष्यित केलेल्या बाबींमुळे आणि विकास संकल्पनेच्या मदतीमुळे 'पारंपारिक' किंवा 'मागासलेल्या' समाजांचे आधुनिकीकरण होऊ शकते.

विकासाच्या संकल्पनेत अनेक पैलूंचा समावेश होतो आणि काळानुसार त्यात बदल होत गेले.

**विकासाचे वैशिष्ट्ये आणि स्वरूप**

- विकास म्हणजे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सुधारणा.
- विकास हा संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य प्राधान्यांपैकी एक असा उपक्रम आहे. सर्व लोकांसाठी उच्च दर्जाचे जीवनमान मिळवण्यासाठी विकास हा बहुआयामी उपक्रम आहे. आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण संरक्षण हे शाश्वत विकासाचे परस्परावलंबी आणि परस्पर बळकट करणारे घटक आहेत.
- लोकशाही, सर्व मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचा आदर, विकासाच्या अधिकारासह, पारदर्शक आणि जबाबदार शासन आणि समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रशासन आणि नागरी समाजाचा प्रभावी सहभाग हा देखील समाजाच्या प्राप्तीसाठी आवश्यक पायाचा एक आवश्यक भाग आहे.
- महिलांचे सक्षमीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रात समानतेच्या आधारावर त्यांचा पूर्ण सहभाग विकासासाठी मूलभूत आहे.
- विकास ही एक अशी प्रक्रिया आहे जी वाढ, प्रगती, सकारात्मक बदल किंवा भौतिक, आर्थिक, पर्यावरणीय, सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय घटकांची भर घालते.
- विकासाचा उद्देश लोकसंख्येच्या जीवनाची पातळी आणि गुणवत्ता वाढवणे आणि पर्यावरणाच्या संसाधनांना हानी न करता स्थानिक प्रादेशिक उत्पन्न आणि रोजगाराच्या संधींची निर्मिती किंवा विस्तार करणे.
- सामाजिक बदलाच्या संपूर्ण प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी काही प्रकारच्या कृती किंवा हस्तक्षेपाशी विकास अधिक जवळून संबंधित आहे.
- विकास ही एक गतिमान संकल्पना आहे जी पूर्वीच्या परिस्थितीत बदल किंवा त्यापासून दूर जाण्याची सूचना देते.
- आज सर्व समाज बदलत आहेत आणि बदलाचे स्वरूप आणि गती प्रभावित करण्यासाठी आणि समाजाच्या विस्तारासाठी वेगवेगळे पैलू विकसित करण्याचा प्रयत्न हा विकासाच्या माध्यमातून केला जातो.
- विकासामध्ये आधुनिक उत्पादन पद्धती आणि सुधारित सामाजिक संस्थेद्वारे उच्च प्रति व्यक्ति उत्पन्न आणि राहणीमानाचे स्तर निर्माण करण्यासाठी सामाजिक व्यवस्थेमध्ये नवीन कल्पनांचा समावेश होतो.
- विकासाचा अर्थ पारंपारिक किंवा पूर्व-आधुनिक समाजाचे तंत्रज्ञानाच्या प्रकारांमध्ये आणि संबंधित सामाजिक संघटनेत संपूर्ण रूपांतर आहे जे पाश्चात्य जगाच्या प्रगत राष्ट्रांचे वैशिष्ट्ये आहे.
- सामाजिक आणि मानवी विकासासाठी, लोकांच्या भल्यासाठी योजना, धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये आर्थिक आणि सामाजिक घटकांना एकत्रित विकासाची संकल्पना पुढे जाते.

- विकास हा संख्यात्मक आणि गुणात्मक दोन्हीही बाजूत मोजता येतो.
- अन्न, निवारा, शिक्षण यांच्या वितरणातील उपलब्धता आणि सुधारणा याचा समन्वय साधून संबंधित ,प्रक्रियेद्वारे आरोग्य, संरक्षण इ.समाजासाठी निर्माण करून उत्पन्न, नोकऱ्या, शिक्षण इत्यादींसह 'जीवनाच्या स्तरांमध्ये सुधारणा घडून आणणारी प्रक्रिया म्हणजे विकासाकडे पाहिल्या जाते.
- सामाजिक, राजकीय वाढीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करू आर्थिक प्रणाली आणि संस्था विकासाच्या संकल्पनेत मानवी प्रतिष्ठा आणि आदर वाढवतात.
- व्यक्ती आणि राष्ट्रांसाठी उपलब्ध आर्थिक आणि सामाजिक पर्यायांच्या श्रेणीमध्ये विस्तारीत रूपात विकास दिसून येतो.
- विकासाची संकल्पना ही सामाजिक, आर्थिक,

राजकीय स्वरूपात मोजली जाते.

**विकासाच्या संकल्पनेची मोजमाप करणारी तत्वे**

**मानव विकास निर्देशांक (HDI)**

मानवी विकासाची व्याख्या लोकांचे स्वातंत्र्य आणि संधी वाढवण्याची आणि त्यांचे कल्याण सुधारण्याची प्रक्रिया म्हणून केली जाते. मानवी विकास म्हणजे खरे स्वातंत्र्य सामान्य माणसाने ठरवायचे आहे की कोणी काय व्हावे, काय करावे, कसे जगावे.

अर्थशास्त्रज्ञ महबूब उल हक यांनी मानवी विकासाची संकल्पना विकसित केली होती. 1970 च्या दशकात जागतिक बँकेत आणि नंतर त्यांच्या स्वत: च्या देशात, पाकिस्तानमध्ये अर्थमंत्री म्हणून डॉ. हक यांनी असा युक्तिवाद केला की मानवी प्रगतीचे विद्यमान उपाय लोकांचे जीवन सुधारण्यासाठी - विकासाच्या खऱ्या उद्देशासाठी अयशस्वी ठरले. विशेषतः, त्यांचा असा विश्वास होता की सकल देशांतर्गत उत्पादनाचे सामान्यतः वापरले जाणारे माप कल्याणचे पुरेसे मोजमाप करण्यात अयशस्वी झाले. नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन आणि इतर प्रतिभावान अर्थशास्त्रज्ञांसोबत काम करताना, 1990 मध्ये डॉ. हक यांनी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला, जो संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे कार्यान्वित झाला होता.

- **सकल देशांतर्गत उत्पादन (GDP)**
- **कामाचे प्रकार (आर्थिक क्षेत्र)**

**सामाजिक विकास आणि सामाजिक ऑडिट लेखापरीक्षण**

सामाजिक विकास हा एक व्यापक शब्द आहे जो समाजाच्या सर्वांगीण तयारीसाठी केलेल्या कृतींचे वर्णन करतो.सकारात्मक परिणाम आणि नकारात्मक सामाजिक परिणामांना प्रतिबंधित करतात. समाजाच्या सर्वांगीण स्वरूपावर सकारात्मक आणि नकारात्मक गोष्टीचा मोठा प्रभाव पडतो त्यामुळे शिक्षण आरोग्य बालमृत्यू या सगळ्याच बाबींचा सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

सामाजिक ऑडिट हे सामाजिक आणि नैतिक कामगिरीचे मोजमाप करण्याचा, समजून घेण्याचा, अहवाल देण्याचा आणि शेवटी सुधारण्याचा एक मार्ग आहे. सामाजिक लेखापरीक्षण दृष्टी/ध्येय आणि वास्तविकता, कार्यक्षमता आणि परिणामकारकता यांच्यातील अंतर कमी करण्यास मदत करते.

- **शिक्षण आणि साक्षरता**
- **आरोग्य आणि कल्याण**

**लोकसंख्या निर्देशक**

- **आयुर्मान (37 - 80 वर्षे)**
- **बालमृत्यू (100 प्रति हजार)**
- **नैसर्गिक वाढ (0 - 4.7 %)**

**आर्थिक विकास**

आर्थिक विकास म्हणजे असे कार्यक्रम, धोरणे किंवा उपक्रम जे समाजाचे आर्थिक कल्याण आणि जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न करतात.

आर्थिक विकास हा शब्द विशिष्ट क्षेत्रात आर्थिक प्रगतीच्या उद्देशाने केलेल्या एकत्रित कृतींचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. विकास ही एक समाजात संपत्ती निर्माण करण्याची आणि टिकवून ठेवण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक समुदायाकडे अद्वितीय मालमत्ता आहे ज्याचा उपयोग नियोक्ते आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी केला जाऊ शकतो.

आर्थिक विकास म्हणजे वेगवेगळ्या लोकांसाठी वेगवेगळ्या गोष्टी करताना व्यापक स्तरावर, निरोगी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि निर्माण करण्यासाठी समुदाय जे काही करतो ते आर्थिक विकासाच्या संकल्पनेत येताना आपला दिसून येते.आजचे आर्थिक विकास व्यावसायिक धोरणकर्ते, सार्वजनिक आणि इतर व्यावसायिकांसाठी अधिक ठोस आणि ठळकपणे त्यांच्या क्षेत्राची व्याख्या करण्यासाठी पूर्वीपेक्षा जास्त प्रयत्न करत आहेत.

आर्थिक विकासाचे प्राधान्यक्रम वेगवेगळे असले तरी, आर्थिक विकासाच्या धोरणांचा उद्देश सामान्यपणे समाजाच्या सकारात्मक परिणामांसाठी असतो, त्यामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टींचा विचार केला जातो.

- अधिक नोकऱ्या आणि अधिक नोकऱ्यांची विविधता निर्माण करणे
- व्यवसाय निर्मिती
- जीवनाची व जीवनशैलीची चांगली गुणवत्ता विकसित करणे
- अधिक लोक आणि व्यवसाय कर भरतात
- मालमत्तेचा अधिक उत्पादक प्रमाणात वापर
- स्थानिक उत्पादने बनवणे आणि विक्री करणे
- समुदायात राहणाऱ्या अधिक कुशल कामगार मिळवणे

## राजकीय विकास

राजकीय संस्था मधील बदल प्रक्रिया म्हणजेच राजकीय विकास होय असा सर्वसाधारणपणे राजकीय विकासाचा अर्थ लावला जातो कारण विकास या शब्दांमध्ये किंवा संकल्पनेमध्ये बदलाची दिशा दाखवलेली आहे त्यामुळे राजकीय क्षेत्रातील बदल ही सर्वमान्य अशी व्याख्या राजकीय विकासाची केली जाते.

### आय सेटान्ड

सातत्याने होणाऱ्या बदलास पचवण्याची क्षमता असणारी संस्थापक यंत्रणा म्हणजेच राजकीय विकास होय.

### आल्फ्रेड डायमंड

विशिष्ट राजकीय परिस्थिती निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय विकास नसून त्या प्रक्रियेत सतत वाढणारे सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आणि संरचनाचे जाळे निर्माण करणे म्हणजेच राजकीय विकास होय.

आधुनिक काळात राजकीय व्यवस्थेचे कार्य हे मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे त्यामुळे आधुनिक राजकीय व्यवस्थेला वेगवेगळी कार्य करावी लागतात. राजकीय व्यवस्थेने समाजासाठी केलेली जी काही कार्य आहेत त्याचा समावेश हा राजकीय परिवर्तनामध्ये होत असतो. म्हणून परिवर्तनाच्या वाटचालीत राज्यव्यवस्था आणि समाज हे दोघेही एकमेकांवर अवलंबून असतात त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राजकीय विकास हा अत्यंत महत्त्वाचा असतो.

कोणत्या शासन व्यवस्थेत राजकीय विकास होतो हे सांगणे कठीण असले तरी त्या देशात किंवा त्या देशात लोकांच्या वाढत्या मागण्या ती राजकीय व्यवस्था कशा रीतीने हाताळते यावरच राजकीय विकासाची भवितव्य अवलंबून असते**.**

### राजकीय विकासावर परिणाम करणारे घटक

- देशाची विकासाची रणनीती आणि राजकीय व्यवस्था यांचा जवळचा संबंध आहे. एखाद्या देशाने राबवलेली आर्थिक विकासाची रणनीती हा त्याच्या राजकीय व्यवस्थेवर थेट परिणाम असतो, ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत त्याचे यश किंवा अपयश ठरते. आर्थिक वाढ ,सामाजिक विकासाची पातळी, पाहता राजकीय स्थिरता महत्त्वाची असते.
- राजकीय विकास जसा जसा वाढत जातो तसा तसा ती राजकीय व्यवस्था जर एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रित झाली तर त्या राजकीय व्यवस्थेची वाढ आणि विकास होत नाही त्यामुळे त्या राजकीय व्यवस्थेचे प्रशासकीय विकेंद्रीकरण आणि राजकीय विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे.
- राजकीय विकासाचा अभाव असलेल्या राजकीय व्यवस्थेत राजकीय मूल्य आणि संस्कृतीचे अवमूल्यन होऊ शकते.

- ज्या राजकीय व्यवस्थेत कायद्याचे समान पालन केले जात नाही, त्या राजकीय व्यवस्थेत काही लोकांना आणि प्रभावी गटांना राजकीय प्रक्रियेतून काढून टाकले जाते त्या ठिकाणी कायद्याचे राज्य अस्तित्वात येत नाही त्यामुळे कायद्याचे राज्य असणे हे राजकीय विकासासाठी आवश्यक आहे.
- ज्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सांमजस्य, एकात्मता दिसून येत नाही त्या व्यवस्थेचा राजकीय विकास योग्य गतीने होत नाही. त्यामुळे राजकीय सामंजस्य आणि एकात्मता ही राजकीय विकासासाठी महत्त्वाची आहे.

विकासाच्या संकल्पनेचे मोजमापाची तत्वे साध्य करण्यासाठी विकासाच्या तत्त्वज्ञानाने काही निकष पुढीलप्रमाणे सांगितले आहेत :

- भौतिक गरजा, विशेषतः अन्न मिळवण्याची क्षमता
- नोकरी (सशुल्क रोजगार आवश्यक नाही) परंतु अभ्यास करणे, कुटुंबासाठी काम करणे
- समानता, जी स्वतःच्या अधिकारात एक उद्दिष्ट मानली पाहिजे;
- शासनातील सहभाग
- आर्थिक आणि राजकीय दोन्ही दृष्ट्या खरोखर स्वतंत्र असलेल्या राष्ट्राशी संबंधित; आणि
- पुरेशी शैक्षणिक पातळी (विशेषतः साक्षरता)

## ३.४ सारांश

**सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेमध्ये आधुनिकीकरण आणि विकास ह्या संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या असून आधुनिकीकरणाच्या संदर्भात चर्चा करताना** आधुनिकीकरण म्हणजे एखादी गोष्ट अद्ययावत करण्याची किंवा समकालीन प्रणालीत कार्य करण्याची प्रक्रिया म्हणून आधुनिकीकरणाकडे पाहिल्या जाते तर विकासाच्या संदर्भात चर्चा करताना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रामुख्याने प्रत्येक राष्ट्र विकासावर लक्ष केंद्रित करू लागले आहे.बदल हा निसर्गाचा नियम आहे, समाज, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, भूगोल आणि संस्कृती - या सर्व बदलाच्या अखंड प्रक्रियेतून जातात त्यामुळे विकासाची संकल्पना ही अत्यंत महत्त्वाची ठरताना दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

**१.आधुनिकीकरणाची संकल्पना सांगा**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

**२.आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये सांगा.**

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

**३.विकासाच्या वेगवेगळ्या पैलूंची चर्चा करा.**

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

**४.राजकीय विकास संकल्पना स्पष्ट करा.**

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## ३.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

Abrahamian, E. (1982). Iran Between Two Revolutions. US, Princeton University Press.

Abrahamian, E. (2008). A History of Modern Iran. U.K, Cambridge University Press.

Almond, G. A. and J. S. Coleman (1960). The Politics of the Developing Areas. U.K, Princeton University Press.

Bashiriyeh, H. (1984). The State and Revolution in Iran,1962-1982. U.S, ST.Martin Press.

Bashiriyeh, H. (2001). Obstacles to Political Development in Iran.

Iran, Gam-e no. Binder, L. (1962). Iran: Political Development in a Changing Socity. U.S, University of California press.

Burnel, P. (2005). Politics in the Developing World. U.K, Oxford University Press.

Chahabi, H. E. (1990). Iranian Politics and Religious Modernism.

Dowd, Douglas F.(September 1967)“Some Issues of Economic Development and of Development Economics,” Journal of Economic Issues, 1

Deutch, K. W. (1961). "Social Mobilization and Political Development." The American Political Science Association.

Gokhale, B. K. (2006). Political Science. India, Himalaya Publishing House.

Kasych . A & Vochozka . M. ( 2019 ). Globalization processes in the modern world chall enging the national economy development . SHS Web of Conferences

Mohammad Abid, 2004. POLITICAL MODERNISATION : THE CONCEPT, CONTOURS AND DYNAMICS,The Indian Journal of Political Science Vol. 65, No. 4 (Oct.-Dec., 2004), pp. 590-602 (13 pages),Published By: Indian Political Science Association

Shahid Jamal Ansari,1998,Political Modernization in the Gulf,Northern Book Centre,new Delhi.

Turner and Hulme (1997).Governance, Administration and Development; Make the State Work.. Houndmills,

Basingstoke Hampshire: Macmillan Press Ltd

White, C. (1987).State, Culture and Gender: Continuity and Change in Women‟s Position in Rural Vietnam‟, in Afsher, H. (ed.). Women, State and Ideology: Studies from Africa and Asia. London: Macmillan Press.

World Bank (2001).World Development Report 2000/2001:Attacking Poverty Oxford: Oxford University Press**.**

❄❄❄❄❄❄❄

# ४

# परिवर्तनवादी चळवळी व आंदोलने

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय प्रवेश

४.४ प्रमुख उदारमतवादी प्रवाहातील चळवळी : ग्राहक चळवळ आणि भ्रष्टाचार विरोधी चळवळ

४.५ नवीन व जुन्या सामाजिक चळवळी

४.४ सारांश

४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.१ उद्दिष्टे :

**"परिवर्तनवादी चळवळी व आंदोलने"** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्‌दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१.भारतातील प्रमुख उदारमतवादी प्रवाहातील चळवळी संबंधी माहिती प्राप्त होईल.

२.ग्राहक चळवळीचे स्वरूप समजून घेता येईल.

३.भ्रष्टाचार विरोधी चळवळीची भूमिका लक्षात येईल.

४.नवीन सामाजिक चळवळीचे कार्यक्षेत्र जाणून घेता येईल.

५.जुन्या सामाजिक चळवळीचा आढावा घेता येईल.

## ४.२ प्रास्ताविक :

भारतात ब्रिटीश काळात ज्या सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत. प्रामुख्याने त्यांना जुन्या सामाजीक चळवळी म्हणून ओळखले जाते. तसेच त्या उदारमतवादी स्वरूपाच्या प्रमुख सामाजिक चळवळी होत्या. त्यांचे कार्यक्षेत्र धर्मसुधारणा, अंधश्रधा निर्मुलन, रूढी, प्रथा, परंपरा व अनिष्ठ चालीरीती, कर्मकांड, मूर्तीपूजा यास विरोध, सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनरविवाहाचे समर्थन, स्त्रीशिक्षणाचा आग्रह इत्यादी स्वरूपाचे होते. राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुशानी आर्यसमाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज या चळवळीद्वारे सामाजिक समस्या सोडविण्याचा व समाज सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात नवीन सामाजीक चळवळी उदयास आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी चळवळी, आदिवासी चळवळ, पर्यावरण चळवळ, ग्राहक चळवळ, भ्रष्टाचार चळवळ, महिला हक्क चळवळ आशा अनेक चळवळी निर्माण झाल्या आहेत. या चळवळीच्या माध्यमातून सामान्य व्यक्तीला न्याय, हक्क बहाल करून त्यांचे अनेक प्रश्न व समस्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## ४.३ विषय प्रवेश :

सामाजिक चळवळी समाजातील मानवी संबंधांमध्ये नवे परिवर्तन घडवून आनु पाहतात. परस्परांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल घडून आणला जातो. उदा. जाती धर्मावरून माणसाचे श्रेष्ठ व कनिष्ठत्व धर्मावरून की व्यक्तीच्या कर्तुत्वावरून ठरवावयाचे यासंबंधीची दृष्टी विकसित करण्याकरिता धार्मिक चळवळी झाल्या. तसेच स्त्रिया दलित कामगार यांना सोशन मुक्त करण्यासाठी त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अधिक निकोप कसा होईल. यासाठी प्रबोधनपर चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळीचा विचार करताना माणसाचे सामाजिक अस्तित्व हे केंद्रभूत असून एकूण समाज व्यवस्थेच्या संदर्भात परिवर्तनाची प्रक्रिया घडवून आणण्यात या चळवळीचा वाटा काय आहे ? याचा विचार या अभ्यासातून आपल्याला करावयाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यउत्तर कालखंडात भारतात विविध सामाजिक चळवळी झाल्या. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांचा आपण परिचय करून घेणार आहोत व आधुनिक भारताच्या जडणघडणीत या चळवळींचा वाटा कितपत होता हे समजावून घेणार आहोत.

## ४.४ प्रमुख उदारमतवादी प्रवाहातील चळवळी : ग्राहक चळवळ आणि भ्रष्टाचार विरोधी चळवळ

### ४.४.१ ग्राहक संघ चळवळ :-

आंतरराष्ट्रीय पातळीवरची एक महत्वपूर्ण चळवळ म्हणून ग्राहक हक्क चळवळीचा उल्लेख केला जातो. ग्राहक चळवळी संदर्भात जागतिक पातळीवर महत्त्वाचे कार्य केल्याबद्दल अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष जॉन केनेडी यांना श्रेय दिले जाते. १५ मार्च १९६२ रोजी केनेडी यांनी ग्राहकांच्या मूलभूत हक्कांची पार्लमेंट मध्ये घोषणा केली. तेव्हापासून १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. ग्राहक चळवळीचे प्रमुख प्रणेते म्हणून रलाफ नादर यांनीही आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्राहक चळवळीचे काम यशस्वीपणे पाहिले आहे.

भारतात ग्राहक संघ हा ग्राहकांच्या सेवे संदर्भातील एक प्रमुख चळवळ होय. ग्राहक संघाचा अर्थ जाणून घेतांना असे म्हणता येईल की, "ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी किंवा ग्राहकांनी खर्च केलेल्या पैशांचा त्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी ग्राहकांनी एकत्र येवून स्थापन केलेली ऐच्छिक संघटना होय." या संघटनेचे कार्य म्हणजे ग्राहकांना त्यांच्या फसवणूकी पासून दूर ठेवणे. यात हा संघ ग्राहकांना वस्तूच्या अवास्तव किंमती, भेसळ, बनावट माल या विरोधात संघटीत करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करतो.

### ४.४.२ ग्राहक चळवळीचे स्वरूप :-

ग्राहक संघातील ग्राहकाने त्यांच्या मालांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी माहितीच्या हक्काचा वापर केला. उदा. १९८० मध्ये ग्राहक शिक्षण आणि संशोधन केंद्र अहमदाबाद यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा इतर राज्यांमध्ये आणि देशांमध्ये कोणत्या पध्दतीचा आहे. यावर संशोधन केले. यामध्ये त्यांनी अमेरिका, कॅनडा या राष्ट्रांचा अभ्यास करून माहितीचा अधिकार कायदा लागू करण्याचा आग्रह केला. याशिवाय चेन्नई येथील ग्राहक कृती संघटनेने तामिळनाडू माहितीचा अधिकार १९९७ या कायद्याचा वापर करून ग्राहकांना न्याय मिळवून दिला. भारतातील इतर छोट्या संघटना आणि काही छोट्या गटांच्या चळवळी माहितीचा अधिकार लागू करण्यासाठी पुढे आल्या. यात बिहार आणि झारखंड या राज्यामध्ये "पंचायत बचाव अभियान या अनौपचारिक चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली." या बरोबरच काही "अशासकीय संस्थांनी माहितीच्या अधिकाराची गरज लक्षात घेवून पारदर्शकतेची उत्कृष्टता या उद्देशानुसार त्यांच्या संघटनेने विविध कार्यालयातील माहिती नागरिकांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला." अशासकीय संघटनाचे हे एक महत्त्वाचे पाऊल होते की, ज्यामुळे सरकारला माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यास भाग पाडले. यामध्ये शासनाने या संस्थांना परकीय अनुदानाबाबतची माहिती लोकांसमोर देण्याचे धाडस केले. गोवा राज्यात गोव्याच्या माहितीच्या कायद्यान्वये पत्रकारांनी माहिती अधिकार कायद्याचा प्रश्न उचलून धरला. आणि प्रसिध्दी माध्यमांनी या प्रकरणात लक्ष घालून माहितीचा अधिकार कायदा नागरिकांना देण्यात यावा. यासाठी प्रयत्न चालू ठेवले. अशा प्रकारे भारतामधील छोट्या संघटना आणि इतर महत्त्वाच्या संघटनांनी माहिती अधिकार कायदा लागू करण्यासाठी जनआंदोलनाचा रेटा सुरू ठेवून शासनावर दबाव आणला. माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू करण्यासाठी विविध चळवळी बरोबरच प्रसारमाध्यमांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.

### ४.४.३ ग्राहकाचे हक्क व अधिकार :-

भारतामध्ये १९८६ चा ग्राहक संरक्षण कायदा ही एक फार मोठी देणगी सामान्य नागरिकांना प्राप्त झाली आहे. एखादी वस्तू किंवा सेवा विकत घेताना ग्राहकाचे हक्क आणि जबाबदाऱ्या कोणत्या प्रकारच्या असतात हे स्पष्ट करने महत्त्वाचे आहे. प्रत्येक ग्राहकाला आपल्या हक्कांची जाणीव असायला हवी, असे ग्राहक चळवळीची भूमिका आहे. ग्राहकांनी नेहमी चोखंदळ आणि चिकित्सक असायला हवं, जेणेकरून आपली कुणी फसवणूक करणार नाही. ग्राहक संरक्षण कायद्या अंतर्गत १९८६ नुसार प्रत्येक भारतीय ग्राहकाला सहा प्रकारचे मूलभूत हक्क व अधिकार बहाल करण्यात आले आहेत. त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

#### १. ग्राहक सुरक्षेचा हक्क :-

ग्राहक एखादी वस्तू विकत घेतो तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी उत्पादकांनी घेणे अनिवार्य असते. आपण ज्या वस्तू विकत घेतो, त्याची उपयुक्तता हाच एकमेव निकष नाही, तर त्या वस्तू सुरक्षितही असाव्यात. उदा इलेक्ट्रिकल उत्पादन घेताना ही काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात वस्तू विकत घेण्यापूर्वी त्याच्या गुणवत्तेबाबत तसेच त्या वस्तूवर मिळणाऱ्या सेवा बाबत आग्रही राहण्याचा ग्राहकाला पूर्णपणे अधिकार आहे. ग्राहकांनी शक्यतो, आय.एस. ओ. ISO आणि सरकारी मोहर असलेल्या वस्तूच विकत घ्याव्यात.

जेणेकरून यामध्ये डुप्लिकेट वस्तूची खरेदी टाळता येईल. जर ग्राहकाने खरेदी केलेल्या एखाद्या वस्तूंच्या वापरामुळे शारीरिक किंवा आर्थिक नुकसान झाले, तर कंपनीला नुकसान भरपाई द्यावी लागते. हा ग्राहकांचा मूलभूत हक्क आहे.

**२. वस्तू उत्पादनाच्या माहितीचा हक्क :-**

ग्राहकाने खरेदी केलेल्या एखाद्या वस्तूच्या उत्पादनाबद्दल सर्व माहिती मिळवणं हा ग्राहकाचा हक्क आहे. त्या उत्पादनाची गुणवत्ता, प्रमाण, संख्या, शुद्धता या सर्वांची माहिती मिळण्याचा हक्क ग्राहकांना आहे. एखादं उत्पादन किंवा सेवा घेण्यापूर्वी त्या संदर्भातील पूर्ण माहिती घेण्याचा अधिकार ग्राहकाला असतो. हा हक्क कोणताही दुकानदार किंवा व्यावसायिक नाकारू शकत नाही. उदा. सोने खरेदी करण्यापूर्वी त्याची शुद्धता तपासून घेण्याचा अधिकार ग्राहकांना आहे.

**३. वस्तूची निवड करण्याचा अधिकार :-**

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणून वस्तू खरेदी करण्यासाठी जर तुम्ही एखाद्या दुकानात गेला आणि त्या ठिकाणी तुम्हाला फक्त एकाच ब्रँडच्या वस्तू दाखवण्यात आल्या किंवा एखादी वस्तू दुकानदार विकत घेण्यास सांगत असेल, तर लक्षात घ्या की हे तुमच्या हक्काचे उल्लंघन आहे. त्यामुळे तुम्हाला तुमच्या पसंतीच्या ब्रँडची वस्तूची खरेदी करण्याचा पूर्णपणे अधिकार आहे. उदा. तुम्ही एखाद्या हॉटेलमध्ये गेलात आणि त्या ठिकाणी तुम्ही शीतपेय मागविले पण वेटरने म्हटलं की या ठिकाणी तुम्हाला फक्त एकाच कंपनीचा शीतपेय मिळेल तर हे तुमच्या हक्कां विरोधात असेल. बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडण्याचा ग्राहकांना अधिकार आहे.

**४. ग्राहकांचे म्हणणे मांडण्याचा हक्क :-**

जर ग्राहकाला असे वाटले असेल की, तुमची फसवणूक झाली आहे. तर तुम्हाला तुमचं म्हणणं योग्य ठिकाणी मांडण्याचा पूर्ण हक्क आहे. ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सरकारने तक्रार निवारण केंद्र आणि ग्राहक न्यायालयांची स्थापना केली आहे. तसेच तक्रार निवारण कायद्याचीही निर्मिती करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर ग्राहक त्यांचे म्हणणे सरकार पर्यंत पोहोचविण्यासाठी ग्राहक मंचाची देखील स्थापना वेळप्रसंगी करू शकतात. अर्थात या ग्राहक मंचाचे शिष्टमंडळ ग्राहकांचे तक्रार किंवा गाऱ्हाणे सरकारकडे मांडू शकतात. सरकारही त्यांच्या सूचना आणि शिफारशींवर गांभीर्यपूर्वक विचार करते.

**५. तक्रार निवारण हक्क :-**

जर एखाद्या ग्राहकाची फसवणूक झाली असेल. तर त्याला तक्रार नोंदविण्याचा हक्क आहे. जर तक्रार खरी असेल तर तिचं निवारण होईल. असा हक्क कायद्याने ग्राहकाला दिला आहे. अनेक वेळा एखादी तक्रार लहान असू शकते पण तरी देखील त्या विरोधात दाद मागण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.

**६. ग्राहक शिक्षणाचा अधिकार:-**

ग्राहक हक्क शिक्षणाच्या अभावामुळे ग्राहकांची फसवणूक होते असे ग्राहक हक्क चळवळीच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. ग्राहकांनी आपले हक्क काय आहेत ? हे नेहमी जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी सरकार वेळोवेळी उपक्रम राबवत असते. तसेच स्वयंसेवी संस्था अनेक शिबिरे किंवा कार्यशाळा घेत असते. ग्राहक शिक्षणावर सगळ्यात जास्त भर असायला पाहिजे. जेणेकरून प्रत्येक ग्राहक सक्षम होईल. असे मत मुंबई ग्राहक पंचायतच्या शिक्षण विभाग प्रमुख वसुंधरा देवधर यांनी बीबीसी द्वारे बोलताना व्यक्त केले आहे. वरील प्रमाणे हक्क व अधिकार कायद्यानेच ग्राहकांना मिळालेले आहेत.

**४.४.४ ग्राहकांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या :-**

ग्राहकांना केवळ मूलभूत हक्कच प्राप्त झाले नाहीत. त्यांना काही कर्तव्य किंवा जबाबदाऱ्या देखील आहेत. याची जाणीवही ग्राहकांना असावी लागते. ग्राहकांनी ब्युरो ऑफ इंडियन एगमार्क आणि आयएसओ ISO प्रमाणित उत्पादन विकत घ्यावीत. प्रमाणित केलेली उत्पादने सुरक्षेची एका प्रकारे हमी देतात म्हणून ती घेणे योग्य ठरते. ग्राहकांची फसवणूक झाल्यास तक्रार निवारण केंद्र उपलब्ध आहेत पण आपल्या जागृतीमुळे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण तणाव कमी होऊ शकतो आणि सर्वांचा वेळ वाचू शकतो. यातील दिरंगाई कमी होऊ शकते.

**४.४.५ ग्राहक कायदे :-**

**४.४.६ तक्रार निवारण कायदा (विधेयक - २०११) :- (Grievance Redressal Bill)**

विशिष्ट काल मर्यादेत नागरिकांना वस्तू व सेवांचा पुरवठा प्राप्त करण्याचा अधिकार आणि तक्रार निवारण विधेयक - २०११ असे या कायद्याला पूर्ण नावाने ओळखले जाते. या तक्रार निवारण विधेयकातील

**महत्त्वपूर्ण तरतुदी :-**

(१) विशिष्ट काल मर्यादेच्या अंतर्गत राहून नागरिकांना आवश्यकतेप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करणे तसेच सेवा पुरविणे आणि त्या संबंधातील निर्माण झालेल्या तक्रारींचे निवारण करणे यासंदर्भातील नागरिकांचे अधिकार ओळखणे.

(२) नागरिकांच्या अधिकारांना घटनात्मक किंवा कायदेशीर दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ६ महिन्याच्या आत नागरिकांच्या अधिकारांची सनद प्रकाशित करणे बंधनकारक आहे.

(३) त्वरित व गुणात्मक दृष्ट्या परिणामकारक सेवा पुरविण्यासाठी माहिती आणि सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी सार्वजनिक अधिकाऱ्यांची आवश्यकता असते.

(४) तक्रार निवारण अधिकारी (GRO) ची नियुक्ती केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा व तालुका स्तरावर करावी. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरूनही अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. तक्रार निवारण अधिकारी जीआरओ दिलेल्या

निर्णयाच्या विरोधात नागरिक ३० दिवसांच्या आत वरिष्ठ पातळीवरच्या नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडे दावे करू शकतात.

(५) सदरील अधिकाऱ्याने वस्तू व सेवांबद्दलच्या तक्रारी बद्दल वेळीच माहिती किंवा निवारण न केल्यास त्या अधिकाऱ्यास ५००००/- एवढा दंड होऊ शकतो.

(६) या कायद्याचे कार्यक्षेत्र - सार्वजनिक प्राधिकरणावर वेळेच्या आत वस्तूंचा पुरवठा आणि सेवा देण्याचे या कायद्यान्वये बंधनकारक केले आहे. राज्यघटनेनुसार निर्माण झालेले तसेच संसदेने पारित केलेल्या किंवा महत्त्वपूर्ण प्रमुख संस्था किंवा राज्य विधानसभेने पारित केलेल्या कायद्याद्वारे निर्माण झालेल्या संस्था या कायद्याअंतर्गत येतात.

उदाहरणार्थ स्वयंनिर्मित संस्था, शासकीय अनुदान पात्र अशासकीय संस्था, संघटना किंवा खाजगी व्यावसायिक संघटना, संस्था किंवा कंपन्या इत्यादी या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येतात.

(६) सार्वजनिक प्राधिकरण अधिकारी आणि विभागप्रमुखांचे दायित्व या घटकांतर्गत नागरिकांच्या अधिकार प्रकाशित करणे, माहिती व सेवा केंद्राची स्थापना करणे, तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्ती करणे, तक्रार निवारण अधिकारी या विषयी सगळीकडे माहिती पुरविणे, तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी सर्व माहिती संग्रहित करून ठेवावी. तसेच नागरिकांच्या अधिकारांसंबंधीची माहिती प्रतिवर्षी अद्यावत करावी. तसेच नागरिकांचे सर्व अधिकार सर्वच सार्वजनिक ठिकाणी मोफत प्रसारित करावी. या पद्धतीने सर्वसामान्य नागरिकास वस्तू व सेवांच्या संदर्भात निर्माण झालेल्या तक्रारी संबंधित या तक्रार निवारण कायद्याअंतर्गत माहिती प्राप्त करून दिली जाते.

### ४.४.७ सार्वजनिक सेवांचा अधिकार कायदा - २०१५ :- (Right To Public Services)

महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित असलेला हा एक महत्त्वपूर्ण कायदा आहे. हा कायदा महाराष्ट्र सार्वजनिक सेवांचा अधिकार म्हणून ओळखला जातो. आणि २८ एप्रिल २०१५ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये हा कायदा लागू करण्यात आला आहे. तसेच हा कायदा सर्वच सार्वजनिक प्राधिकरणांना लागू होतो.

### तरतुदी :-

(१) ज्याद्वारे महाराष्ट्र राज्यातील एखाद्या नागरिकास पारदर्शक, तात्काळ आणि वेळेत माहिती प्राप्त व्हावी. या उद्देशाने निर्माण करण्यात आला आहे. या कायद्याद्वारे एखाद्या पात्र व्यक्तीला कायदा, नियम, आदेश, शासकीय अध्यादेश, इत्यादींची माहिती हवी असेल, तर ती त्वरित पुरविली जाते. २ सार्वजनिक सेवा अधिकाऱ्यामार्फत या कायद्याची अंमलबजावणी करताना विशिष्ट काल मर्यादेचे पालन त्याला करावे लागते. तसेच याविषयीची कार्यवाही करण्यासाठी नियुक्त अधिकारी तसेच प्रथम व दुय्यम अपिलीय अधिकारी त्यांची काल मर्यादा स्वरूप आणि फी या विषयीची माहिती द्यावी लागते.

(३) विशिष्ट काल मर्यादेच्या आत सार्वजनिक सेवांचा अधिकार मिळावा. या उद्देशाने कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता यानुसार प्रत्येक पात्र नागरिकाला विशिष्ट कालमर्यादेतच सार्वजनिक सेवांचा लाभ मिळण्याचा अधिकार प्राप्त व्हावा. यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे.

(४) या कायद्यांतर्गत माहिती प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र असलेल्या नागरिकास नियुक्त अधिकाऱ्याने सार्वजनिक सेवांचा लाभ मिळवून देणे बंधनकारक आहे. त्यासंबंधीची माहिती प्रदान करण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा ही निवडणुका किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात राज्यशासन वाढू शकते. अशा पद्धतीने सार्वजनिक सेवांचा अधिकार कायदा अंतर्गत माहिती देण्याची प्रक्रिया राबविली जाते.

**सारांश:-**

अशाप्रकारे ग्राहकांना वस्तू खरेदी करण्यासाठी अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. वस्तूंचे भाव वस्तूची गुणवत्ता वस्तूची कंपनी वस्तूची गॅरंटी वॉरंटी वस्तूचे बिल वस्तू घेण्यातील सवलती या प्रकारचे सर्व अधिकार ग्राहकांना प्राप्त झाले आहेत. वस्तू खरेदी संदर्भातील तक्रारींबाबत ग्राहक मंच किंवा ग्राहक न्यायालयामध्ये आपली तक्रार ग्राहकांना नोंदवता येते. सामान्य ग्राहकांची फसवणूक होत नाही. अशा प्रकारचे सर्व हक्क आणि अधिकार प्राप्त करून देण्यात अनेक ग्राहक चळवळीचे मोठे योगदान राहिले आहे.

**आपली प्रगती तपासा**

1. ग्राहक चळवळीचा अर्थ सांगून ग्राहक कायदे स्पष्ट करा ?

2. ग्राहकांचे हक्क व अधिकार यांची चर्चा करा ?

**४.४.२ भ्रष्टाचार विरोधी चळवळ :-**

आज भारत देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. देश प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असताना भ्रष्टाचाराने संपूर्ण देशाला पोखरून टाकले आहे. सामान्य माणसांना जीवन जगणे अशक्य झालेले आहे. कुठेही गेलो तरी पैसे दिल्याशिवाय कामच होत नाही असे एकही क्षेत्र राहिले नाही की ज्या ठिकाणी भ्रष्टाचार हा नाही. त्याचबरोबर आज वाढत्या भ्रष्टाचारामुळेच महागाईच्या भस्मासुराने उग्र स्वरूप धारण केले आहे.

भ्रष्टाचार ही समस्या नवी नाही, ती प्राचीन कालखंडात देखील अस्तित्वात होती. आणि आजही ती पहावयास मिळते. मुळात भ्रष्टाचार ही समस्या नसून ती एक सनातन प्रवृत्ती आहे. प्राचीन काळामध्ये कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथांमध्ये विशेषतः भ्रष्टाचाराचे विस्तृत असे वर्णन केले आहे. कौटिल्यच्या मते स्वार्थापोटी लोभी वृत्तीने लाच खाणारे भ्रष्टाचारी अधिकारी व नोकर यांची संख्या राज्यात काही प्रमाणात असतेच एवढेच नव्हे, तर भ्रष्टाचाराबाबत कौटिल्य असे देखील म्हणतो की, ज्याप्रमाणे मनुष्य जिभेवरील मधाची चव चाखल्याशिवाय राहत नाही. त्याप्रमाणे राजाच्या खजिन्यात काम करणारे कर्मचारी थोडा तरी पैसा खाल्ल्याशिवाय राहणार नाहीत. पाण्यात राहणारे मासे पाणी केव्हा पितात हे कळने अशक्य आहे. त्याचप्रमाणे सरकारी तिजोरी जवळ असणारे अधिकारी पैसा केव्हा खातात हे कळणे अशक्य आहे. भ्रष्टाचाराचा प्रश्न हा एक विशिष्ट देशापुरता मर्यादित न राहता आज तो जगातील विकसित आणि अविकसित देशांनाही भेडसावत आहे.

ब्रिटिशकालीन राज्य व्यवस्थेमध्ये देखील भ्रष्टाचाराचे प्रमाण काही बहुअंशी होते. केवळ ब्रिटिशकालीन प्रशासनातच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर भारतामध्येही भ्रष्टाचाराची समस्या अस्तित्वात आहे. गेल्या ६२ वर्षाच्या कालखंडाचा आढावा घेतला, तर भारतीय समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात भ्रष्टाचार चालू असलेला दिसतो. आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य, धार्मिक अशा सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार, लाचलुचपत, सत्तेचा गैरवापर या गोष्टी आढळतात.

त्याचप्रमाणे जागतिक स्तरावर भ्रष्टाचार, काळा पैसा या गोष्टी आढळून येतात. भारतातील अनेक लोकांनी कोट्यावधी रुपये स्विस बँकेत ठेवलेले आहेत. मागील काळात इटलीमध्ये सर्व समाज भ्रष्टाचाराने एवढा पोखरून गेला होता की, त्यामुळे तेथे भ्रष्टाचार निर्मूलनासाठी सामूहिक बहिष्काराचा मार्ग स्वीकारावा लागला. जपानमध्ये तीन पंतप्रधानांना आपले पद भ्रष्टाचारामुळे गमवावे लागले. त्याचबरोबर अमेरिकेचे माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन तसेच इतर राजकीय व्यक्तीवर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झाले होते. भारतात देखील अनेक मंत्री राजकीय व्यक्ती व अधिकारी यांना आपले पद भ्रष्टाचारामुळे गमवावे लागले आहे. भ्रष्टाचार ही समस्या सर्वांना एकमताने मान्य आहे. आणि जणू काही तीच एकमेव समस्या देशापुढे असून ती संपवली की देशाचे नंदनवन होईल. असे अनेकांना वाटते ती समस्या म्हणजे भ्रष्टाचार संपविण्यासाठी प्रत्येक जण वेगवेगळी प्रिस्क्रिप्शन लिहितो आहे. अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांना लोकपाल विधेयकाच्या कायद्यात भ्रष्टाचाराच्या समाप्तीची शक्ती आहे असे वाटते. तर कुणाला आणखी काही वाटते. त्यामुळे अधिकच कोणाचा उपाय चांगला या विषयावर वाद होऊन भ्रष्टाचाराची मूळ समस्या तशीच कायम राहते.

**४.४.२.१ भ्रष्टाचाराचा अर्थ :-**

१. **कॉलिनसन** यांच्या शब्दकोशांनुसार, " अधिकार व सत्ता धारण करणाऱ्यांचे अप्रामाणिक व बेकायदेशीर वर्तन" असा भ्रष्टाचाराचा अर्थ दिलेला आहे.

२. **सामाजिक शास्त्राच्या शब्दकोषात**, "कायद्याचा भंग करून व्यक्तिगत फायद्यासाठी सार्वजनिक सत्तेचा गैरवापर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय."

३. **रॉबर्ट ब्रूक** यांच्या मते, भ्रष्टाचार म्हणजे अशी कृती होय की, जी सामाजिक परिवर्तन विवेक व जननीच्या विरोधी असते.

४. **संथानम** समितीच्या मते, "भ्रष्टाचार म्हणजे स्वार्थासाठी अयोग्य रीतीने आपला पदाचा केलेला वापर होय."

५. **फुल्लर** यांच्या मते, "Accountability Lies in the heart of man When it dies there no constitution No cool cancel it will fight lies there is a need no constitution no law no court save it".

### ४.४.२.२ वाढत्या भ्रष्टाचाराची कारणे:-

१. भ्रष्टाचाराचे पाळेमुळे ही राजकीय व्यवस्थेतच दिसून येतात. राजकीय पदाधिकारी प्रशासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करतात.

२. प्रशासकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार होण्यास समाज व्यवस्था बळी पडलेली दिसते. प्रशासनातील कार्यासाठी लोकांना पैसे द्यावे लागतात.

३. उद्योगपती व व्यापारी अधिक लाभाच्या हव्यासापोटी राजकीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच लाच देतात.

४. कायद्यातील त्रुटीचा उपयोग करून भ्रष्टाचार केला जातो.

अशा अनेक कारणांनी भारतातील भ्रष्टाचार खूप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. अनेक प्रकारच्या तक्रारी निर्माण झाल्या आहेत. त्या तक्रारीची निवारण करण्यासाठी भारतात लोकपाल ही संस्था असणे आवश्यक आहे. यासंबंधी विचारवंतानी आपले विचार मांडले आहेत. सन १९५९ साली अर्थतज्ञ श्री. सी. डी देशमुख यांनी लोकपाल पदाची आवश्यकता व महत्त्व सांगून भारतात असे पद निर्माण करणे गरजेचे आहे, असे मत मांडले. सन १९६३ मध्ये मा. खासदार डॉ. एल. एम. सिंघवी यांनी लोकसभेत सर्वप्रथम लोकपालाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी लोकपालास व लोकस्वरक्षक यास अबुजमेट असे म्हटले.

### ४.४.२.३ भ्रष्टाचार निर्मूलनासाठी काही उपाययोजना :-

भारतातील होणाऱ्या भ्रष्टाचारावर प्रतिबंध घालण्यासाठी खालील काही उपाययोजना सांगता येऊ शकतात.

**१. प्रशासकीय कामकाज पद्धती सुलभ करावी :-**

प्रशासकीय कार्यातील असणारी गुंतागुंतीची कार्यपद्धती, दिरंगाई सुलभ व सोपी केल्यास जनतेला काम करून घेण्यासाठी अवैध मार्गाचा अवलंब करण्याची गरज पडणार नाही. प्रशासकीय दिरंगाई टाळावी.

**२. सेवाशर्ती आकर्षक बनविणे :-**

प्रशासकीय सेवातील कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले जाणारे वेतन हे अपुरे असल्याने त्यांच्या दैनंदिन गरजा त्यामध्ये भागत नाहीत. ज्यामुळे हे कर्मचारी भ्रष्ट

मार्गाकडे वळतात. मात्र त्यांना चांगले वेतन देण्याची व्यवस्था झाली तर ते भ्रष्टाचार करणार नाहीत. असे सांगण्यात येते. पुन्हा आपल्या देशात या उलटा नको असा सूर पुढे येतो. कारण पाचव्या वेतन आयोगानंतर भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झाले असे म्हणणे हास्यास्पद ठरेल.

**३. कठोर कार्यवाहीची तरतूद :-**

भ्रष्टाचारा बाबत कठोर आणि तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असते. याबाबत लोकप्रशासनाच्या अहवालात १९५१ मध्ये असे म्हटले आहे. की व्याख्या केली पाहिजे की कोणी कितीही मोठ्या पदावर असो, त्याच्यावर जबाबदार व्यक्तीने आरोप केलेले असतील. प्रथम दर्शनी तसा पुरावा दिसत असेल, तर तो व्यक्ती चौकशी पासून मुक्त राहू शकणार नाही. भारतात १९६२ साली के. संथानम या प्रसिद्ध संसद सदस्याच्या अध्यक्षतेखाली भ्रष्टाचाराच्या निर्मूलनावर उपाय करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीने १३७ शिफारशी विविध खात्यातील भ्रष्टाचाराबाबत केल्या होत्या. पण त्यापैकी १०६ शिफारशी भारत सरकारने स्वीकारल्या. मात्र त्यांची अंमलबजावणी झाली नाही. अशा शिफारशींची अमलबजावणी झाली पाहिजे.

**४. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे नैतिक आचरण :-**

प्रशासकीय भ्रष्टाचाराची सुरुवात नेहमीच वरिष्ठा पासूनच होते. मंत्र्यांचे सार्वजनिक जीवन स्वच्छ असेल तर त्यांचे सहायक व सल्लागार भ्रष्ट मार्गाने जगण्याचे धाडस करू शकत नाहीत. त्यामुळे कनिष्ठ स्तरातील भ्रष्टाचाराला सुद्धा आळा बसतो.

**५. भ्रष्टाचार विरोधी जनमत :-**

जोपर्यंत लोक स्वतःहून भ्रष्टाचार विरोधात स्पष्ट भूमिका घेत नाहीत. त्याविरुद्ध आवाज उठवीत नाही. तोपर्यंत भ्रष्टाचाराविरुद्ध शासनाने केलेल्या कोणत्याही उपाययोजना यशस्वी होणार नाहीत. थोडक्यात, आपणास वरील प्रमाणे काही भ्रष्टाचारावर उपाय योजना करता येतील.

**सारांश :-**

भारतातील भ्रष्टाचार कोणत्याही एका संस्थेच्या निर्मितीमुळे थांबणार नाही. तर मुळातच सामाजिकतेला नैतिक अधिष्ठान प्राप्त होत नाही. तोपर्यंत भारतीय समाजाला भ्रष्टाचाराचा हा प्रश्न सातत्याने भेटणार आहे. संसदेला ओव्हरटेक करणे ऐवजी संसदेला वळसा घालण्याची आगामी निवडणुकीत सहभागी होऊन स्वच्छ चरित्राचे लोक सांसदेत जातील याचा विचार केला पाहिजे. राजकीय प्रक्रिया बाबत लोकांमध्ये नफरत वाढू देणे या देशाला परवडणारे नाही. त्यातून विभूती पूजक सरंजामी भारताची वाटचाल हुकूमशाहीकडे होईल. ती लोकशाहीची मृत्यू घंटा असेल. २००५ साली झालेल्या एका सर्वेनुसार एकूण मध्यमवर्गाच्या ५६ ते ६२ % मध्यमवर्ग हा खाजगी उद्योगांवर ग्लोबल फायनान्स इंटिग्रेटेड च्या २०१० च्या अहवालानुसार भारतातील एकूण भ्रष्टाचाराच्या ६८ % भ्रष्टाचार हा १९९१ नंतरचा आहे. आणि या प्रश्नाचा लाला या कॉर्पोरेट मध्यम वर्गाची साथ आहे. तोच वर्ग आज भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवतो आहे. याचे इतका मोठा विरोधाभास कोणताही नाही.

**आपली प्रगती तपासा**

1. भ्रष्टाचाराचा अर्थ सांगून भ्रष्टाचाराची प्रमुख कारणे सांगा ?

2. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी उपाययोजना सांगा ?

## ४.३ नवीन किंवा जुन्या सामाजिक चळवळी :-

सामाजिक चळवळ ही मनुष्यासाठी नवीन नाही. इतिहासात अनेक सामाजिक चळवळींचा उल्लेख आढळतो. कुटुंबसंस्था, जाती व्यवस्था, सामाजिक वर्ग, माणसांतील परस्पर संबंधाबाबत असलेले सामाजिक नियम, रूढी, चाली, रीती, परंपरा या संदर्भात सामाजिक चळवळीचा अभ्यास केला जातो. सामाजिक चळवळीमुळे सामाजिक संस्थांमधील एखादा भाग अथवा पूर्ण समाज व्यवस्थाच बदलण्याचा संभव असतो. काही चळवळी सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त असतात. तर काही प्रगतीत आडसर म्हणून उभ्या राहतात. तसेच काही चळवळी यशस्वी तर काही अयशस्वी होतात.

### ४.३.१ सामाजिक चळवळीचे स्वरूप :-

सर्वसाधारणपणे ज्या चळवळी लोकांमध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणतात त्यांना सामाजिक चळवळी असे म्हटले जाते. समाज घटकांच्या सामुदायिक प्रश्नांना घेऊन चळवळी आकार घेत असतात. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सामुदायिक कृतीच्या स्वरूपात जेव्हा संप, मोर्चा, घोषणा, सभा, मिरवणुका अशा कृती होऊ लागतात. तेव्हा सामाजिक चळवळीचे दृश्य स्वरूप पुढे येते. मात्र या दृश्य स्वरूपाच्या सामुदायिक कृतींच्या आधी परिवर्तनाचा विचार अस्तित्वात असतो. हा विचार एखाद्या व्यक्तीने दिलेला असतो. अशा चळवळींना त्या व्यक्तीचे वैचारिक नेतृत्व लाभते. ती व्यक्ती आपल्या वैचारिक तत्त्वज्ञानातून आणि कृतीयुक्त कार्यक्रमातून अशा चळवळीचे प्रतिनिधित्व करते. ही चळवळ जेव्हा पसरते तेव्हा या व्यक्तीला अनेक अनुयायी लाभतात. व ते या चळवळीचा प्रसार करतात. कधी परिवर्तनाच्या गरजेतून तर कधी परिस्थितीच्या रेट्याने ही चळवळ उभी राहते. म्हणजे प्रारंभी चळवळीचे नेतृत्व पुन्हा व्यक्तीकडे अथवा वैचारिक सांप्रदायाकडे नसते. कधी ह्या चळवळी अनुकूल सामाजिक बदल घडवून आणतात. तर कधी त्यांचे फलश्रुती प्रतिकूलही ठरते. चळवळ ही एक विकसित होणारी प्रक्रिया आहे. चळवळ ह्या दडपणुकीचा प्रतिकार करण्यासाठी जुन्या रुढींना विरोध करण्यासाठी गुलामी पारतंत्र्य परंपरागत व कालबाह्य सामाजिक संकेत यांच्याविरुद्ध संघर्ष करून नवमताचा प्रसार करण्यासाठी मानवी सुख व स्वातंत्र्याचा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी

केल्या जातात. सामाजिक चळवळींचे स्वरूप हे सांघिककृतीचे असते. लोकसहभागा शिवाय सामाजिक चळवळ अस्तित्वात येत नाही. ह्या सांघिक कृतीसाठी चळवळीला किमान संघटनात्मक पाया असावा लागतो. हे संघटनात्मक स्वरूप कधी अत्यंत औपचारिक पातळीवरचे व लवचिक असेल, तर कधी ते सुस्थापित संघटनात्मक स्वरूपाचे औपचारिक संस्थेच्या पातळीचे असेल, कधी एखाद्या खाजगी गटाने केलेल्या सामुदायिक उठावालाही सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकते. सामाजिक चळवळीला ध्येय असावे लागते. हे ध्येय कधी समाजाच्या एखाद्या क्षेत्रात बदल घडवून आणण्या पुरते मर्यादित असेल, तर कधी ते समग्र परिवर्तनाची आकांक्षा ठेवणारे असेल. सामाजिक चळवळीला स्वतःचे असे बांधिलकीचे तत्त्वज्ञान असावे लागते. आपल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी चळवळी विविध मार्गांचा अवलंब करतात. त्यात प्रसंगी सामाजिक आदर्श यांचा विधीनिषेध न बाळगता आपल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी हिंसा, कायदेभंग अशा मार्गांचाही अवलंब केला जातो. काही चळवळी ह्या बहुमुखी स्वरूपाच्या असतात. त्यात निरनिराळ्या संघटनांचा समावेश असतो. एखाद्या सामुदायिक हिताच्या प्रश्नावर हे गट एकत्र येतात. समाजातील एखाद्या क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी किंवा नवीन समाजरचनेच्या निर्मितीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याकरिता औपचारिक अथवा अनौपचारिक रित्या संघटित झालेल्या लोकसमुदायाची सांघिक कृती म्हणजे सामाजिक चळवळ होय. अशा पद्धतीने सामाजिक चळवळीचे स्वरूप हे बहुआयामी असते.

### ४.३.२ सामाजिक चळवळीचा अर्थ व व्याख्या:-

१. **एच. ए. ब्लूमर** यांच्या मते, "रूढ सामाजिक संबंधांमधील एखाद्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी करण्यात येणारे सांघिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय." मोठ्या प्रमाणावरील लोकसहभाग हे अशा चळवळीचे वैशिष्ट्य असते.

२. **रुडोल्फ हेबर्ले** यांच्या मते, " समाजाच्या संस्थात्मक ढाच्यात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा संपूर्ण नव्या समाज व्यवस्थेच्या निर्मितीसाठी विविध पातळीवर सांघिक प्रयत्न होत असतात, अशा विविध सांघिक उपक्रमांना सामाजिक चळवळ असे म्हणतात."

३. **जे. आर. गसफिल्ड** यांच्या मते, " प्रस्थापित समाज रचनेत बदल घडून आणण्यासाठी करण्यात येणारया सामुदायिक मागण्या हे सामाजिक चळवळीचे स्वरूप असते."

४. **आर. टर्नर आणि एल. किलियन** यांच्या मते, " सामाजिक परिवर्तनासाठी प्रवर्त झालेल्या किंवा अशा परिवर्तनाला सिद्ध झालेल्या संपूर्ण समाजाच्या अथवा समाज गटाच्या सातत्यपूर्ण कृतीस सामाजिक चळवळ असे म्हणतात."

५. **एम. एस. ए. राव** यांच्या मते, " आधीच निश्चित केलेल्या वा नंतर उदित झालेल्या एखाद्या आदर्शवादावर आधारून सामुदायिक संघर्षाद्वारे जे अविरत प्रयत्न होत असतात, त्यांना सरोदय  हे नाव देणे योग्य होईल."

### ४.३.३ सामाजिक चळवळीची कारणे :-

सामाजिक चळवळीची क्षेत्रे ही बहुतांशी चळवळीस दिलेल्या नावावरून स्पष्ट होऊ शकतात. उदा. कामगार चळवळ, दलित चळवळ, स्त्रियांची चळवळ, पर्यावरणाची चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासी चळवळ, विद्यार्थी चळवळ, शिक्षक चळवळ, धार्मिक चळवळ, जातीय चळवळ, भाषिक चळवळ अशा विविध प्रकारच्या चळवळी असतात. त्या त्या समूहाचे हितसंबंध साध्य करण्यासाठी व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी या चळवळी निर्माण होत असतात. अर्थात चळवळीची कारणे ही सामाजिक वर्गाचे किंवा गटांचे प्रश्न किंवा सामाजिक उद्दिष्ट पूर्तीच्या प्रक्रिया यावरून ठरविण्यात येतात. त्यासाठी काही संज्ञा किंवा संकल्पना वापरल्या जातात. प्रामुख्याने त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल. सांस्कृतिक प्रवाह सामाजिक विघटन सामाजिक असंतुष्टता सापेक्ष वंचितता सामाजिक अन्याय आकलन दर्जातील विसंगती या संज्ञा किंवा संकल्पनांच्या भोवती समाजाचे सर्व प्रश्न व समस्या गुरफटलेल्या असतात.

### ४.३.४ सामाजिक चळवळींचे प्रकार :-

समाजातील बहुतांशी सामाजिक चळवळी विविध नावाने ओळखल्या जातात. जसे हुंडाविरोधी चळवळ, डाव्या पक्षाची चळवळ, झोपडपट्टी निर्मूलन चळवळ, कामगार संघटनेची चळवळ, इत्यादी. ह्या चळवळींचे स्वरूप हे संघटित अथवा असंघटित असते. यातून पुढे जेव्हा काही सामुदायिक कृती घडतात, तेव्हा चळवळ सुरू झाली असे समजतात. उदा. संप, निषेध, मोर्चा, विरोध, सत्याग्रह, हरताळ, घेराव, दंगा किंवा बंडखोरी इत्यादी. अशा कृती घडल्यावर चळवळीस सुरुवात झाली आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

अनेक वेळा सामाजिक व राजकीय चळवळींमध्ये फरक केला जात नाही. सामाजिक चळवळींमध्ये इतरही चळवळी समाविष्ट आहेत. ज्यांचे उद्दिष्ट राजकीय बदल घडून आणणे असा आहे. उदा. एम. एस. ए. राव यांच्या मते नक्सलाईट चळवळीचे उद्दिष्ट हे राज्य सत्ता मिळविणे आहे. आणि मागासवर्गीय चळवळीचे उद्दिष्ट उच्च दर्जा प्राप्त करणे असे आहे. रुडोल्फ हेबर्ले यांनी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक चळवळ ही राजकीय आहे. कारण प्रत्येक चळवळीतील सभासद हा राजकीय सत्ता मिळविण्याचे प्रयत्न करीत असतो. राज्यशास्त्रज्ञ तर सामाजिक चळवळ हा शब्द फार लवचिकपणे वापरतात. सामाजिक चळवळी संदर्भात हर्बर्ट ब्लूमर यांनी चळवळीचे मूलभूत दोन प्रकार सांगितले आहेत. एक म्हणजे सुधारणावादी चळवळ आणि दुसरे क्रांतिकारी चळवळ या दोन्ही मूलभूत चळवळींचे संक्रमण हे विविध टप्प्यांच्या यंत्रणेवर अवलंबून असते. या टप्प्यांवरून दोनही मूलभूत चळवळीतील फरक ब्लूमर यांनी प्रतिपादित केला आहे. सामाजिक चळवळीचे प्रकार सांगत असताना प्रामुख्याने अविस्कृत चळवळी, धर्मपंथीय चळवळी, फॅशन चळवळी, मूलभूत चळवळी, पुनरुजजीवनवादी चळवळी, देशीवादी चळवळी इत्यादींचा उल्लेख केला जातो.

### ४.३.५ स्वातंत्र्यपूर्व काळातील सुधारणावादी चळवळी:-

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतात काही विचारवंतांनी सुधारणावादी चळवळी सुरू केल्या. ह्या चळवळी सामाजिक व धार्मिक स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे या चळवळीना जुन्या सामाजिक चळवळी असे संबोधले जाते. त्यात बुद्धिवाद व मानवता यावर भर दिलेला होता.

या चळवळींमध्ये ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, सत्यशोधक समाज, इत्यादींचा फार मोठा सहभाग होता. ब्रिटिश भारतात आल्यावर त्यांच्या संपर्कातून भारतीय समाजात बदल घडत गेले. उदारमतवादी सिद्धांतावर आधारित असे हे बदल व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिकतेकडे झुकणारे होते. अशा या तत्त्व प्रणालीतून पुढे धार्मिक व सामाजिक चळवळी घडून आल्या. त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

**१. ब्राम्हो समाज :-**

आधुनिक काळात भारतातील धर्म सुधारना चळवळींचा प्रारंभ बंगालमध्ये झालेला दिसतो. १८२८ साली राजाराम मोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. या ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून धार्मिक रूढी, परंपरा, चाली, रीती, अंधश्रद्धा, कर्मकांड, इत्यादी. कर्मठपणा नाहीसा व्हावा. तसेच विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करून सतीप्रथा, बालविवाह, इत्यादी. वाईट प्रथा कायद्याने समाजातून बंद व्हाव्यात यासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना करण्यात आली.

**२. प्रार्थना समाज:-**

ब्राह्मो समाजाच्या चळवळीचे प्रणेते श्री. केशव चंद्रसेन १८६४ मध्ये मुंबईत आले असता, डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा झाली. त्यातून प्रेरणा घेऊन १८६७ साली मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली. प्रार्थना समाजाचे संस्थापक व सभासदांमध्ये डॉ. पांडुरंग आत्माराम तरखडकर न्या. महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर, नारायण केशव चंदावरकर, इत्यादी. त्यावेळच्या उच्चविद्याविभूषितांचा समावेश होता. पुढे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पंडिता रमाबाई, यांनीही प्रार्थना समाजाच्या कामात पुढाकार घेतला.

महाराष्ट्रात प्रार्थना समाजाची स्थापना होण्यापूर्वी इसवी सन १८४० साली दादोबा पांडुरंग, रामकृष्ण बाळकृष्ण जयकर, लक्ष्मण शास्त्री हळबे, इत्यादींनी परमहंस सभा स्थापन केली होती. त्या पाठीमागे पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचीच प्रेरणा होती. सर्व धर्माचे सार एकच असल्याने धार्मिक भेदभाव मानून नयेत, ही या सभेची शिकवण होती. धर्माच्या नावावर ती समाजातील अनिष्ट चाली, रीती, परंपरा, अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, इत्यादींचे निर्मूलन करण्यासाठी प्रार्थना समाजाने पुढाकार घेतला होता. मूर्तिपूजा, कर्मकांड, बालविवाह, विधवा विवाह, जातीभेद, नष्ट करणे, स्त्रियांकडे पाहण्याचा एक उदात्त दृष्टिकोन या समाजाने अशा प्रकारची शिकवण दिली.

**३. आर्य समाज :-**

इंग्रजी राजवटीत ख्रिस्ती धर्म प्रसारकांना मिळालेल्या राजाश्रयामुळे ख्रिस्ती धर्माचा प्रसार वाढू लागला होता. अशावेळी आपली संस्कृती धोक्यात आली आहे. या तीव्र जाणीवेतुन स्वामी दयानंद सरस्वती यांनी हिंदूंच्या वैदिक संस्कृतीचे पुनर्जीवन करण्यासाठी संघटित स्वरूपाची चळवळ उभारली. ब्राह्मो समाजात काम करीत असताना त्यांनी १८७५ साली मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना करून भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध करण्यासाठी आर्य समाजाची संघटना बांधायला सुरुवात केली. या समाजाच्या माध्यमातून वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करून

समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, मूर्तीपूजा, इत्यादी. अनिष्ट प्रथेला विरोध केला तसेच हिंदू धर्मप्रसाराचे कार्य या समाजाने हाती घेतले.

**४. सत्यशोधक समाज:-**

महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून ब्राह्मणांचे बहुजनांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी महात्मा फुले यांनी वैदिक धर्म व वैदिक धर्मातील कर्मकांड, मूर्तीपूजा व अनिष्ट प्रथा, परंपरा यांना विरोध केला. अर्थात ब्राह्मणवादाला फुले यांनी विरोध करून हिंदू धर्माचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न या समाजाच्या माध्यमातून केला.

अशा रीतीने सन १८१८ नंतर इंग्रजी सत्ता फार वेगाने वाढली आणि त्यांच्या वाढत जाणाऱ्या प्रभावामुळे समाजात इंग्रजांविरोधी चळवळी उभा राहिल्या. या चळवळी विविध पंथांच्या स्वरूपात निर्माण झाल्या. त्यात प्रामुख्याने ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाचा समावेश होतो.

### ४.३.६ महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील चळवळी :-

गांधीजींनी स्त्रिया, हरिजन व शेतकरी यांच्यापुढे सत्य व आहींसा या तत्वांचा आधार घेऊन विनयशील व प्रामाणिक जीवन जगण्याचा दृष्टिकोन मांडला. राष्ट्रीय चळवळीत प्रत्येक भारतीयांना सामावून घेण्यासाठी त्यांनी विविध मार्गांचा अवलंब केला. थोडक्यात त्यांनी जनतेच्या शक्तीचे राजकीय कृतीत रूपांतर करण्याचे आवाहन पेलले तेव्हा या असहकार, सविनय, कायदे भंगाच्या आणि सत्याग्रहाच्या चळवळी कशा घडल्या ते आपनास स्त्रिया, हरिजन व शेतकरी यांच्या संदर्भातून पाहावे लागते.

**१. सामाजिक रुढीं विरुद्ध चळवळ :-**

गांधीजींनी समाजातील अनिष्ट प्रथा व परंपरा दूर करण्यासाठी अनेक चळवळी उभारल्या. त्यातून स्त्री सक्षमीकरणाचा विडा त्यांनी हाती घेतला उदाहरणात बालविवाह स्पर्धा पद्धती विधवा अवस्था व धार्मिक सुधारणा अंधश्रद्धा या दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर वेश्यावर्तीसही त्यांनी विरोध केला.

**२. हरिजन व अस्पृश्यता निर्मूलन चळवळ :-**

सामाजिक पातळीवर अस्पृश्यता निर्मूलनासाठी महात्मा गांधींनी हरिजन सेवक संघाची स्थापना केली होती. समाजातील मागास जातीतील लोकांवर होणारे अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून प्रयत्न केले.

**३. शेतकरी चळवळ:-**

ब्रिटिशांकडून होणारा शेतकऱ्यांवरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी व शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी तसेच शेतकऱ्यांकडून सक्तीने वसूल केला जाणारा शेतसारा यापासून शेतकऱ्यांची सुटका व्हावी. या हेतूने महात्मा गांधीजी यांनी मिठावरील कर उठवण्यासाठी दांडी यात्रा ही चळवळ हाती घेतली. तसेच खेडा

सत्याग्रह, बारडोली सत्याग्रह इत्यादी चळवळी हाती घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

**४. स्त्रीवादी चळवळ :-**

सामाजिक पातळीवर स्त्रियांना समानतेचे स्थान प्राप्त व्हावे. तसेच स्त्रियांवरती होणारे अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न केले. प्रामुख्याने बालविवाह, विधवा पुनर्विवाह, सती प्रथा, इत्यादी. अनिष्ट प्रथा व परंपरा समाजातून नाहीशा करण्यासाठी प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर वृद्ध व अनाथ व विधवा स्त्रियांसाठी साबरमती आश्रमाची स्थापना केली. आणि स्त्रियांना एक सन्मान प्राप्त करून दिला.

**४.३.७ डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील चळवळी (**आंबेडकरी चळवळी) :-

**१. अस्पृश्यता निर्मूलन चळवळ :-**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संस्कृतीमध्ये रुजलेली चतुर वर्णव्यवस्था व त्या अंतर्गत चालणाऱ्या धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा, परंपरा, रुढी, या सर्व दूर करून सर्व व्यक्तींना माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगता यावे. यासाठी बाबासाहेबांनी अस्पृश्यता निर्मूलन चळवळी हाती घेतल्या. गोलमेज परिषदेतही अस्पृश्यांच्या हक्कासाठी ब्रिटिश सरकारकडे बाबासाहेबांनी मागणी केली. सामाजिक पातळीवर अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. सार्वजनिक ठिकाणी खुली करण्यात आली. अर्थात बाबासाहेबांमुळेच आज अस्पृश्यतेचे निर्मूलन झाले आहे.

**२. भूमिहीनांचा सत्याग्रह किंवा चळवळ :-**

भुमहीनांना शेती करण्यासाठी शासनाने पडीक जमिनी दिल्या पाहिजेत. या मागणीसाठी १९५३ पासूनच शे.का.फे. ने सत्याग्रह सुरू केला होता. त्यापैकी १९६४ च्या भूमिहीनाच्या सत्याग्रहाला अधिक महत्त्व दिले जाते. हा सत्याग्रह देशव्यापी होता. १ ऑक्टोबर १९६४ रोजी देशाच्या विविध भागातून हजारो दलितांनी संसदेवर मोर्चा नेऊन या सत्याग्रहाचे आखणी एन. शिवराज यांनी केली होती. पण त्यांचे सत्याग्रहापूर्वीच निधन झाल्याने या सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी केले. त्यावेळी जिल्हा कचेरी, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय व इतर सरकारी कार्यालयावर दलितांच्या मोर्चाने आपल्या मागण्याकडे शासनाचे आणि जनतेचे लक्ष वेधले. या भूमीहीनाच्या सत्याग्रहामागे डॉ. आंबेडकरांची प्रेरणा राहिलेली आहे.

**३. मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह :-**

चातुरवर्ण व्यवस्था स्वीकारण्यात आल्यामुळे खालच्या वर्गातील व्यक्तींना धार्मिक कार्यामध्ये मंदिर प्रवेश निषेध करण्यात आला होता. धार्मिक सुधारणेच्या माध्यमातून बाबासाहेबांनी अस्पृश्यांना मुक्तपणे मंदिर प्रवेश मिळाला पाहिजे. यासाठी अमरावती, पुणे, नाशिक, अशा अनेक शहरांमधून मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह हाती घेतला. सर्वप्रथम नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह, याचा प्रयोग बाबासाहेबांनी हाती घेतला. त्यामुळेच आज मंदिर प्रवेशाचे दारे सर्वसामान्यांसाठी खुली झाली आहेत.

**४. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह :-**

मुंबई कायदेमंडळ सदस्य सिताराम केशव बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी सार्वजनिक ठिकाणांचा अस्पृश्यांना उपभोग घेता यावा, यासाठी ठराव मांडला. व तो मंजूर करण्यात आला. या ठरावाची अंमलबजावणी व्हावी, असा हुकूम सरकारने ११ सप्टेंबर १९२३ रोजी काढला परंतु त्याची अंमलबजावणी फारशी झाली नाही. यासाठी बहिष्कृत हितकारणी सभेतर्फे महाड येथे मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन आयोजित करण्यात आले. या परिषदेचे अध्यक्ष बाबासाहेब आंबेडकर हे होते. बाबासाहेबांच्या चळवळीचा हा पहिला आविष्कार होता. याच परिषदेत महाडच्या चवदार तळ्याचे पाणी सर्व जमलेल्या लोकांनी प्राशन करावे. आणि चवदार तळ्याचा सत्याग्रह घडून आणावा, असे सुचविण्यात आले. तेव्हापासून चवदार तळे हे सर्व सामान्यांसाठी खुले करण्यात आले.

**५. महिला परिषद व चळवळ :-**

बाबासाहेबांच्या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे चळवळीत असलेल्या महिलांचा सहभाग महाडच्या सत्याग्रहापासून ते आज तागायत हे चित्र दिसते. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या लढल्या आहेत. २० जुलै १९४२ रोजी अखिल भारतीय दलित महिला परिषद अधिवेशनाला जोडून आयोजित केली होती. परिषदेचे अध्यक्ष सुलोचनाबाई डोंगरे ह्या होत्या. बाबासाहेब या परिषदेत बोलताना म्हणाले होते की, माझा महिलांच्या संघटनेवर पूर्ण विश्वास आहे. एकदा बायकांना विचार पटला की, त्या समाज सुधारण्याचे काम मनापासून करतात ज्या ज्या वेळी परिषदांचे आयोजन केले, मेळावे भरले तेव्हा तेव्हा पुरुषांबरोबर स्तीयानीही आले पाहिजे. असा माझा आग्रह होता. म्हणून आपल्या परिषदेत स्त्री-पुरुषांचा संमिश्र समाज असतो. समाजाची प्रगती मोजायची असेल, तर त्या समाजातील स्त्रिया किती प्रगत आहेत. हे पहावे, पुढे बोलताना त्यांनी मुलींनी नवऱ्याचे गुलाम होण्याचे नाकारावे व त्याची सखी म्हणून बरोबर काम करावे. असे सांगितले होते. जातीमुळे निर्माण झालेल्या गुलामीचा ते निषेध करत होते, असे नाही तर स्त्रीने देखील पुरुषाचे गुलाम राहणे, त्यांना मंजूर नव्हते गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो गुलामी विरुद्ध बंड करून उठेल ही त्यांची खात्री होती. अर्थात बाबासाहेबांनी महिलांनाही आत्मबळ व सन्मान निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला.

**६. दलित चळवळी :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले सबंध आयुष्य दलित व अस्पृश्य समाजातील व्यक्तींना सन्मान प्राप्त करून देण्यासाठी खर्च केले आहे. दलितांसाठी अस्पृशता निवारण कायद्यापासून ते आरक्षणापर्यंत अनेक वेळा गोलमेज परिषदेतूनही मागणी केली आहे. तसेच चातुरवर्ण व्यवस्थेला तिलांजली देऊन मनुस्मृतीचे दहन करण्यापासून ते महाड चवदार तळ्याचे सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश तसेच भूमिहीनांच्या सत्याग्रहापर्यंत बाबासाहेबांनी दलितांचे प्रश्न हाती घेतले होते. आज खऱ्या अर्थाने दलित व अस्पृश्य वर्गाला जो सन्मान प्राप्त झाला आहे. त्यामध्ये बाबासाहेबांचेच मोठे योगदान आहे.

**७. नामांतराची चळवळ :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा ही आपली कर्मभूमी मांनली मराठवाड्यासारख्या मागासलेल्या प्रदेशात उच्च शिक्षणाचे अधिकार आहे. हे जाणून त्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. या कार्यामुळे मराठवाड्यातील शैक्षणिक चळवळीचे ते प्रणेते ठरले. मराठवाड्याच्या भूमीवर बाबासाहेबांनी केलेल्या कार्याचे उचित स्मारक असावे, म्हणून मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे अशी मागणी पुढे आली. ही मागणी पुढे रेटण्यामध्ये औरंगाबाद मधील दलित पॅंथरचा सहभाग मोठा होता. त्यांच्या या मागणीचे मराठवाड्यातील जनतेने स्वागत केले. नामांतराच्या मागणीसाठी दलित पॅंथरणे मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सह्यांची मोहीम सुरू केली. दिवसेंदिवस नामांतराची चळवळ अधिक व्यापक होत गेली. दलित पॅंथरणे आपल्या मागणीसाठी गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठावर मोर्चा नेला दलित पंथरच्या मागणीची दखल घेऊन मराठवाडा विद्यापीठ कार्यकारिणीने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे करावे, अशा आशयाचा ठराव पास केला. अर्थात नामांतराचा हा पहिला विजय जरी दलित पॅंथरच्या व इतर दलित चळवळीच्या माध्यमातून साकार झाला असला. तरीही बाबासाहेबांचीच प्रेरणा या चळवळला लाभली होती.

### ४.३.८ भारतातील प्रमुख सामाजिक चळवळी :-

**१. भटक्या विमुकतांची चळवळ :-**

भारतातील विविध भागांमध्ये अनेक भटक्या व विमुक्त जाती वास्तव्य करत आहेत. हालाखीच्या परिस्थितीमध्ये ते जीवन जगत आहेत. अशा भटक्या व विमुक्त जातींचा शोध घेऊन त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांना रोजगार प्राप्त करून देण्यासाठी तसेच भटक्या विमूकतांना त्यांचे हक्क प्रदान करण्यासाठी अनेक नेत्यांनी प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या व  विमुक्त जाती जमाती आहेत. त्यांपैकी २८ भटके आणि १४ विमुक्त आहेत. या ४२ जातींच्या पोट जातींची संख्या सुमारे २०० एवढी आहे. संस्कृती, रूढी, परंपरा, भाषा, व्यवसाय आणि प्रादेशिक कारणांनी या जमातींमध्ये सारखेपणा नाही. प्रत्येक जमातीची भाषा आणि चाली रिती या भिन्न भिन्न आहेत. या सर्वांना सन्मानाचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी चळवळींच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत.

**२. आदिवासींची चळवळ :-**

आदिवासी समाज ही भारतीय जन जीवनापासून प्रादेशिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अलिप्त आहे. भारतात कातकरी, कोलाम, कोरकू, गोंड, दुबळा, ताडवी, प्रधान, पावरा, ठाकूर, भिल्ल, महादेव कोळी, माडिया, वारली, गोवारी, अशा एकूण ४७ जाती व उपजातींमध्ये आदिवासी विभागला गेला आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, दारिद्र्य, बेकारी, अस्वच्छता, रोगराई, कर्जबाजारीपणाच्या चक्रात हा समाज भरडून निघाला आहे. आकाशात फेकले आणि धरतीने झेलले अशी त्यांची श्रद्धा आहे. काही

आदिवासी जमातींमध्ये रोटी व्यवहाराला बंदी आहे. हा समाज अनिष्ट प्रथा आणि पद्धतींमध्ये अडकला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींमध्ये जाऊन त्यांच्या सुधारणा घडवून आणण्याचा अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला आहे. आदिवासींमध्ये नक्षलवादी तरुणांची संख्या अधिक आहे. त्यांच्या या हिंसक कारवाईमुळे शासनही चळवळ दडपुन टाकत आहे. आदिवासींमध्ये अनेक पुरोगामी संघटना आणि स्वयंसेवी संस्था काम करत आहेत. यामध्ये शहादा येथील सर्विस संघटनेचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. दलित चळवळ आणि दलित साहित्याच्या रेट्यामुळे आदिवासी युवकांमध्ये साहित्य आणि चळवळीची प्रेरणा वाढली. वारूळ सोनवणे, भुजंग मेश्राम, विनायक तुमराम आणि नजुबाई गावित, या आदिवासी लेखक आपल्या अनुभवांना ऊजागर करत आहेत यातुनच उद्याची आदिवासी चळवळ निश्चितच गतिमान होईल.

### ३. धार्मिक चळवळी :-

भारतातील अनिष्ट प्रथा व परंपरा आणि कर्मकांड यांच्या विरोधी राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, अण्णा कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक धर्म सुधारणा चळवळी हाती घेतल्या. आणि हिंदू धर्मातील या अनिष्ट प्रथा, परंपरा, रुढी, चाली, रीती, यांना विरोध करून त्यांचे निर्मूलन घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे.

### ४. शेतकरी चळवळी :-

भारतात शेतकऱ्यांचा मोठा वर्ग वास्तव्य करत आहे. समाजातील अठरापगड जातींचे पोट या शेतकऱ्यामुळेच भरते. परंतु समाजामध्ये शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. कोणत्याही प्रकारचा स्वाभिमान आणि सन्मान शेतकऱ्याला प्राप्त झाला नाही. त्यासाठी महात्मा फुलेंच्या शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या अवस्थेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हापासून डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि अनेकांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळ उभारली आहे. प्रत्येक राजकीय पक्षाने देखील शेतकरी आघाडी व शेतकरी संघटना निर्माण केली आहे.

### ५. कामगार चळवळी :-

शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, मजूर व कामगार तसेच उद्योग क्षेत्रातील कामगार या सर्व प्रकारच्या कामगारांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी भारतात अनेक कामगार चळवळी पुढे आल्या आहेत. कामगारांचे हक्क, त्यांचे वेतन, त्यांचे कामाचे तास, विमा व्यवस्था, आरोग्य व शिक्षणाची व्यवस्था या सर्व प्रश्नांकडे अनेक संघटनेने आपले लक्ष केंद्रित केले आहे.

### ६. पर्यावरणवादी चळवळ :-

आज पर्यावरण संतुलन हा जगभरातील सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी भारतातही अनेक चळवळी पुढे आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चिपको आंदोलन, वृक्ष बचाव मोहीम आणि मेघा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली केलेले नर्मदा बचाव

आंदोलन यासारखे अनेक आंदोलने व चळवळी पर्यावरण संवर्धनासाठी पुढे आलेल्या दिसतात.

**७. समाजसुधारकांच्या सुधारणावादी चळवळी :-**

भारताला अनेक समाज सुधारकांचा वारसा लाभलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर इत्यादी. अनेक समाजसुधारकांनी सामाजिक पातळीवर अस्पृश्यता निर्मूलन चळवळ, दलित चळवळ, शेतकरी चळवळ, स्त्री व महिला हक्क चळवळ, कामगार चळवळ, भूमिहक्क चळवळ, पर्यावरण चळवळ, शैक्षणिक चळवळी, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळी व धर्म सुधारणा चळवळी हाती घेतल्या आहेत. या सर्व चळवळीमुळे खऱ्या अर्थाने आज भारताची प्रगती दैदीप्यमान अशी घडून आली आहे. आणि वैज्ञानिकतेचा मोठा वारसा या देशाला निर्माण झाला आहे. निश्चितच या सर्व चळवळींमध्ये सर्व महापुरुषांचे व समाज सुधारकांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

## ४.४ सारांश :-

अशा पद्धतीने भारतात अनेक सामाजिक चळवळी निर्माण झाल्या आहेत. त्यातून नव भारतीय समाजाची जडणघडण झाली आहे. या सर्व चळवळीमुळेच आज भारतीय समाज व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडून आलेले दिसतात.

नेत्र दीपक अशी प्रगती आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताने घडवून आणली आहे. त्यामध्ये अनेक स्तरातून उदयास आलेल्या चळवळीमुळे हे सर्व शक्य झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

1. सामाजिक चळवळीचा अर्थ सांगून नवीन सामाजिक चळवळी यावर भाष्य करा ?

____________________

____________________

____________________

____________________

2. ब्रिटीश कालीन सामाजिक चळवळीची चर्चा करा ?

____________________

____________________

____________________

____________________

## अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-


1. फडके य. दी. (१९९०) विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड. पहिला १९०१ ते १९१४ श्री. विद्या प्रकाशन, पुणे.
2. पाध्ये रमेश, (१९८५) शेतकरी आंदोलन, एल्गार प्रकाशन, मुंबई
3. चव्हाण रामनाथ, (१९९०) जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
4. चव्हाण रामनाथ, (१९८९) भटके विमुकतांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे.
5. फडके य. दी., (१९९०) आंबेडकर चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
6. फडके भालचंद्र, (१९९५) फुले, आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
7. गुरुनाथ नाडगोंडे, (१९८६) सामाजिक आंदोलने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
8. पाटील व्ही. बी., (१९८६) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, पुस्तकालय कोल्हापूर.
9. सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ, (एप्रिल २००२) SOC - २२२ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती केंद्र, नाशिक.
10. जन लोकपाल बिल मुद्रक व प्रशासक, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिद्धी ता. पारनेर जी. अहमदनगर.
11. भारतीय समाजविज्ञान कोश, खंड. ३ आणि खंडाच्या संपादक स. मा. गर्गे, मेहता पब्लिशिंग हाऊस.
12. बी. बी. पाटील, लोकप्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
13. क्रांतीदूत, अण्णा हजारे, डायमंड, प्रकाशन, पुणे.
14. अण्णा हजारे, लोकपाल विधेयक, गोयल प्रकाशन, पुणे.
15. डॉ. बी. एल. फाडिया, लोकप्रशासन, साहित्य भवन, पब्लिकेशन्स, आग्रा.

    श्रीराम माहेश्वरी, भारतीय प्रशासन, ओरिएंट लॉग मन प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई.


❄❄❄❄❄❄❄